www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118




दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ




अधिक माहिती - पान ३

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
■ वर्ष - ०२ ■ अंक १०९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, ६ सप्टेंबर २०२४ ■ रु. २/-
■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# शिक्षकांमध्ये जग बदलण्याची ताकद - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारांचे वितरण



● मुंबई, विशाल कारंडे :

विद्यार्थ्यांना आयुष्याची दिशा दाखविण्यात शिक्षकांचे समर्पण, मार्गदर्शन आणि योगदान महत्त्वाचे असून त्यांच्यामध्ये जग बदलण्याची ताकद असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. महाराष्ट्र विविध क्षेत्रात देशात क्रमांक एकवर आहे. शिक्षण क्षेत्रातही अग्रेसर राहण्यासाठी आपण निर्धार करुया, असे आवाहन त्यांनी केले. सन २०२३-२४ च्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांना आज मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.


एनसीपीए येथील टाटा सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय ए कुंदन, शालेय शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला, शिक्षक आमदार किरण सरनाईक, शिक्षक संघटनेचे पदाधिकारी संभाजी थोरात आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. मंत्री श्री.केसरकर यांच्या कार्यकाळातील निर्णयांचे संकलन असलेल्या कार्यअहवालाचे तसेच बालभारतीच्या वतीने तयार



करण्यात आलेल्या छत्रपती शाहू महाराज स्मृती ग्रंथाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मुख्यमंत्री म्हणाले, शिक्षकांच्या योगदानाशिवाय देश प्रगतीपथावर जाऊ शकत नाही, यामुळेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात राज्याला अग्रेसर राखण्यासाठी नवनवीन कल्पनांना शासनाने नेहमीच पाठबळ दिले आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबरच कौशल्याची जोडही आवश्यक असल्याने नवीन शिक्षण पद्धती अवलंबण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आयुष्यात मोठी उंची गाठणे शक्य होईल आणि या कामी योग्य वेळी योग्य दिशा दाखवण्याचे काम शिक्षक करीत असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले, माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमाच्या माध्यमातून तीन जागतिक विक्रम प्रस्थापित झाले आहेत. आदर्श शाळा विद्यार्थ्यांना जगण्याचा मंत्र शिकवित असल्याने आदर्श शाळा घडविण्यामध्ये शिक्षकांची भूमिका मोलाची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रात देशात पहिल्या क्रमांकाकडे झेप घेण्यामध्ये शासकीय शाळांचा मोठा वाटा असल्याचे सांगून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न आस्थेवाईकपणे सोडविण्यात येतील असेही ते म्हणाले. आपल्या किसननगर येथील शाळेच्या आठवणी जागवून आपल्या प्रगतीमध्ये शिक्षक रघुनाथ परब यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. पान २ वर

## थोडक्यात



### अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावरची सुनावणी संपली

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

कथित मद्य धोरण भ्रष्टाचार प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. अभिषेक मनू सिंघवी हे अरविंद केजरीवाल यांची बाजू मांडत आहेत. या प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना सीबीआयने अटक केली आहे. लोकसभा निवडणूक असल्याने त्यांना काही कालावधीसाठी जामीन मंजूर करण्यात आला होता. मात्र त्यांची रवानगी पुन्हा तुरुंगात करण्यात आली. आता सर्वोच्च न्यायालयात त्यांच्या जामीन अर्जावर सुनावणी होती जी संपली असून न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे.

### राज्यातील ३६ सहस्र ९७८ अंगणवाडीमध्ये सौर ऊर्जा देण्यात येणार !

● मुंबई, विशाल पाटील :



राज्यशासनाच्या स्व:मालकीच्या आणि वीजेची सुविधा नसलेल्या ३६ सहस्र ९७८ अंगणवाड्यांना सौर ऊर्जा देण्याचा महत्त्वाचा निर्णय ५ सप्टेंबर या दिवशी मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांसह अन्य मंत्र्यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या अंगणवाड्यांना १ किलो वॅट क्षमतेचे पारेषण विरहित सौर संच आणि बॅटरी टप्प्याटप्प्याने देण्यात येणार आहेत. महाऊर्जा विभागाद्वारे ही कार्यवाही होणार आहेत. यासाठी ५६४ कोटी रुपये व्यय करण्यास शासनाने संमती दिली आहे. पुणे-शिरूर-अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णयही मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. पुणे ते शिरुर हा ५३ किलोमीटरचा मार्ग ६ पदरी करण्यात येणार आहे.

## ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरणासाठी १५ सप्टेंबर पर्यंत मुदत

● मुंबई, यश सावंत :

ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या वाहन चालकांनी मानवी स्वरूपात अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे. अशा वाहन चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत अनुज्ञप्तीचे (ड्रायव्हींग लायसन्स) संगणक प्रणालीद्वारे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी केले आहे. सप्टेंबरनंतर मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण केले जाणार नाही याची अनुज्ञप्ती धारकांनी नोंद घ्यावी. मुंबई (मध्य) ताडदेव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरात कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, आय ॲण्ड सी सेंटर, वाहन चालक प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम होणार आहे.

## सैन्य दलाचं वाहन ८०० फूट खोल दरीत कोसळलं

### भारताच्या ४ जवानांचा जागीच मृत्यू

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

सिक्किममध्ये भीषण दुर्घटना घडली आहे. सिक्कीममध्ये गुरुवारी भारतीय सैन्य दलाचं वाहन ७०० ते ८०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना घडली आहे. ही भीषण दुर्घटना सिक्कीमच्या पाकयोंग जिल्ह्यात घडली आहे. या दुर्घटनेत भारतीय सैन्य दलाच्या चार जवानांचा मृत्यू झाल्याची माहिती हाती आली आहे. या घटनेची माहिती मिळताच मदत कार्यास सुरुवात करण्यात आली आहे, 'आज तक'ने याबाबत वृत्त दिलं आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताचे चार जवान हे गुरुवारी पश्चिम बंगालच्या पेडोंग येथून सिक्कीमच्या पाकयोंग जिल्ह्यातील सिल्ट मार्गे जुलुक येथे जात होते. याचवेळी रेंक रोंगली राज्य महामार्गावरील दलोपचंदजवळ सैन्य दलाची गाडी ७०० ते ८०० फूट दरीत कोसळली आहे. या भीषण दुर्घटनेत भारताच्या सैन्य दलाचे जेसीओ यांच्यासहित ४ जवानांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भारताच्या ४ जवानांचा मृत्यू झाल्यानंतर सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.



अपघातात मृत पावलेले जवान देशातील विविध भागातील आहेत. मृतांमध्ये मध्य प्रदेशचे चालक प्रदीप पटेल, मणिपूरचे शिल्पाकार डब्लू पीटर, हरियाणाचे नायक गुरुसेव सिंह आणि तमिळनाडूचे सुबेदार थंगापंडी यांचा समावेश आहे. चालकासहित सर्व मृतक सैन्य दलाचे जवान हे पश्चिम बंगालच्या बिनागुडीच्या एका युनिटमध्ये सेवेत होते.

भारतीय सैन्य दलाच्या ट्रकचा वेग अधिक असल्याने अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे भीषण अपघात झाला आहे. भारतीय सैन्य दलातील ४ जणांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

## कल्याणमधून घेतले जयदीप आपटेला ताब्यात

● कल्याण, रोहित जैसवार :

सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा प्रकरणातील मुख्य आरोपी शिल्पकार जयदीप आपटे याला बुधवारी रात्री मालवण पोलिसांनी कल्याणमधून ताब्यात घेतले. तब्बल १० दिवस फरार असलेला जयदीप आपटे हा बुधवारी कल्याणमध्ये त्याच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी आलेला असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. तब्बल १० दिवस पोलिसांना गुंगारा देणारा जयदीप आपटे याला पोलिसांनी अटक केली नाही तर तो स्वत: पोलिसांना शरण आल्याचं आता समोर येत आहे. आरोपी जयदीप आपटेचे वकील गणेश सोवनी यांनी माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. म्हणजे याचाच अर्थ आरोपी जयदीप आपटेला शोधण्यात पोलिसांना यश आलं नाही तर तो स्वत: पोलिसांना शरण गेला असल्याचं आता बोललं जात आहे. दुसरीकडे अशी माहिती समोर येत आहे की, जयदीप आपटे हा चेहऱ्यावर मास्क लावून आणि अंधाराचा फायदा घेत त्याच्या पत्नी आणि आईला भेटण्यासाठी कल्याण येथील राहत्या घरी आला होता.

## ठाण्यात १५८ गणेशोत्सव मंडळे मंडप परवानगीच्या प्रतिक्षेत

### ३०७ पैकी १४९ गणेशोत्सव मंडपांना परवानगी




● ठाणे, सम्यक कासारे :

अवघ्या दोन दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपलेला असतानाच, गणेशोत्सवाच्या मंडपासाठी अर्ज करणाऱ्या ३०७ मंडळांपैकी १४९ मंडळांना पालिका प्रशासनाने परवानगी देऊ केली आहे. उर्वरित १५८ मंडळांना अद्याप परवानगी देण्यात आलेली नसून या मंडळांना परवानगी देण्याची प्रक्रीया सुरू असल्याची माहिती सुत्रांनी दिली. ठाणे महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा होतो. अनेक मंडळांकडून गणेशोत्सवासाठी रस्त्यावर मंडप उभारण्यात येतात. या मंडपांसाठी पालिका प्रशासनाने उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनक तत्वानुसार नियमावली केली आहे. पान २ वर

## भगवान सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त मंत्रालयात अभिवादन

● मुंबई, यश सावंत :

महानुभव पंथाचे संस्थापक, लिळाचरित्रकार भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त (जयंती) कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रालयात चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव दीपक मोरे, अवर सचिव सचिन कावळे,



कक्ष अधिकारी घनश्याम जाधव, विजय शिंदे, नितीन राणे, मंत्रालय संघटनेचे अध्यक्ष भारत वानखेडे यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

# महाराष्ट्राचा स्वाभिमान मोदीकडे गहाण ठेवू नका, राज्यात मविआचे सरकार आणा - मल्लिकार्जुन खरगे

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई - महाराष्ट्रातील महाविकास आघाडी मजबूत आहे, त्याला कोणीही हलवू शकत नाही. तीन पक्ष मिळून चांगले काम करत आहोत. राहुल गांधी यांनी 'डरो मत'चा संदेश दिला आहे, न घाबरता काम करा. भाजपा युती सरकार गुजरातच्या इशा-यावर काम करत आहे. महाराष्ट्राचा स्वाभिमानी मोदींकडे गहाण ठेवू नका. लोकसभेप्रमाणेच भरघोस पाठिंबा देत विधानसभेला मविआचे सरकार आणा, असे आवाहन करुन महाराष्ट्रात मविआचे सरकार आले की केंद्रातील मोदी सरकारही जाईल, असे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे म्हणाले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या 'लोकतीर्थ' या स्मारकाचे लोकार्पण व पूर्णाकृती पुतळयाच्या अनावरणाचा कार्यक्रम सांगली जिल्ह्यातील वांगी येथे झाला, या कार्यक्रमात खरगे बोलत होते. खरगे पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे आदर्श, प्रेरणास्रोत आहेत पण नरेंद्र मोदींचा हात त्यांच्या पुतळ्याला लागताच पुतळा कोसळला. मोदींनी गुजरातमध्ये पुलाचे उद्घाटन केले तो पडला, अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन केले, त्याला गळती लागली. नरेंद्र मोदी हे मतांसाठी दिखाव्याचे काम




करतात. घाईघाईत पुतळा बनवल्याने तो कोसळला व महाराष्ट्राचा आणि देशाचा अपमान झाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यावेळी म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचे महत्व ओळखून गावोगावी शैक्षणिक संस्था उभा करून सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षणाची दारे उघडली, त्या कर्मवीर भाऊराव पाटलांचा आदर्श डोळयासमोर ठेवून डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातून राज्यातील अनेक भागात शिक्षण संस्था सुरु केल्या. पान २ वर


> " लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यावेळी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची माफी मागितली पण ही माफी त्यांनी पुतळ्याचे काम आरएसएसच्या व्यक्तीला दिले, त्यात भ्रष्टाचार झाला म्हणून माफी मागितली का? असा सवाल विचारून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या प्रत्येक व्यक्तीची माफी मागितली पाहिजे असे म्हणाले. शेतकरी आंदोलनात ७०० शेतकरी शहीद झाले, नोटबंदीमुळे लघु, छोटे, मध्यम उद्योग संपवले व लाखो लोकांचे रोजगार घालवले, चुकीच्या पद्धतीने जीएसटी लावला त्याबद्दलही माफी मागा, असे राहुल गांधी म्हणाले.

## संपादकीय

# व्हिएतनाममधून होणारी आयात का वाढली?

व्हिएतनाममधून होणारी भारताची आयात ही जानेवारी ते जुलै २०२४ या काळात १७ टक्क्यांनी वाढली आहे. यामागे चायना फॅक्टर कारणीभूत आहे का? त्याबाबतची कारणमीमांसा देशाच्या अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर हा एप्रिल ते जून या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत मंदावण्याचा अंदाज अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात प्रामुख्याने सरकारी भांडवल खर्चात झालेली घट तसेच शहरी ग्राहकांची मागणीही घटल्याने, विकासदर पाच महिन्यांतील नीचांक गाठेल, असा होरा आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात सार्वजनिक खर्चात घट झाली आणि त्याचाच परिणाम विकासदरावर होईल, असा अंदाज अर्थतज्ज्ञांनी व्यक्तही केला होता. एप्रिल ते जून तिमाहीचा सकल देशांतर्गत उत्पादनातील, म्हणजे जीडीपीमधील वाढीचा वार्षिक दर ६.८ टक्के असेल, असा अंदाज आहे. आधीच्या म्हणजे जानेवारी ते मार्च २०२४ या तिमाही तो ७.८ टक्के होता. या पार्श्वभूमीवर चिंतेची आणखी एक बाब समोर आली आहे. भारताच्या आयातीत 'चायना फॅक्टर' हा महत्त्वाचा बनला आहे.

एकीकडे अमेरिकेतील नरमलेल्या चलनवाढीची आकडेवारी, बेरोजगारीबद्दलचे पोकळ दावे आणि अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या अलीकडील बैठकीतील इतिवृत्ताचा सकारात्मक कल यामुळे भांडवली बाजारात तेजी आली. तसेच गेल्या आठवड्याअखेरीस फेडरल आनी कोयना सोरेटी नाली निर्वअमेरिकेने रिझर्व्हचे प्रमुख जेरोम पॉवेल यांनी 'व्याजदर कपातीची वेळ आली आहे', ही आश्वासक टिप्पणी केली. त्यामुळे जागतिक बाजारात तेजीचे वारे पसरण्यास मदत झाली आहे. अमेरिकेत व्याजदर घटल्यास, तेथील गुंतवणूक भारताच्या दिशेने काही प्रमाणात स्थलांतरित होण्याची शक्यता आहे. तसेच अमेरिकी डॉलरचे घसरलेले मूल्य हेदेखील भारतीय भांडवल बाजारातील सकारात्मक भावनांसाठी पूरक ठरले आहे. म्हणूनच मागच्या काही सत्रांत विक्रेत्याच्या भूमिकेत असलेल्या विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी आता सक्रियपणे खरेदी सुरू केली आहे. मात्र, अचानकपणे व्हिएतनाममधून होणारी भारताची आयात ही जानेवारी ते जुलै २०२४ या काळात १७ टक्क्यांनी वाढली आहे. मुख्यत: बीज सामग्री आणि काही घटक यांची आयात त्यास कारणीभूत ठरली आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग खात्याने ही आकडेवारी प्रस्तुत केली आहे. पहिल्या सहा महिन्यांत व्हिएतनाममधून आपण ५८० कोटी डॉलर्सची आयात केलेली आहे. आर्थिक पाहणी अहवालात असे नोंदवण्यात आले आहे की, चिनी कंपन्या मेक्सिको आणि व्हिएतनामच्या मार्गाने भारतासारख्या देशात माल धाडत आहेत. पूर्व आशियाई देशांतील सरकारे चीनमधून गुंतवणूक आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. चिनी कंपन्या मेक्सिको, व्हिएतनामसारख्या देशांत वेगवेगळी उत्पादने तयार करून, ती भारतासारख्या देशात पाठवत आहेत. या प्रकारे चीनचे 'हॉट ओल्ड फ्लॅट प्रॉडक्ट्स' हे व्हिएतनामच्या मार्गाने भारतात येत आहेत. त्यामुळे भारतातील पोलादाच्या किमतींना फटका बसून, आमचे नुकसान होत आहे. तेव्हा या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी 'इंडियन स्टील असोसिएशन'ने सरकारकडे केली आहे. अर्थातच त्याची दखल सरकारला घ्यावी लागली आहे. आता केंद्रीय उद्योग खात्याने चीनमधून डम्पिंग तर होत नाही ना, याचा तपास सुरू केला आहे. तसे घडत असल्यास अँटी डम्पिंग ड्यूटी लावली जाईल २०१७ पर्यंत भारत पोलाद निर्यात करणारा देश म्हणून प्रसिद्ध होता. परंतु आता भारताने काही 'आसियान' संघटनेतील देशांशी मुक्त व्यापार करार केला आहे. त्यामुळे व्हिएतनामच्या मार्गाने माल आल्यास, त्यावर कर लागत नाही आणि याच गोष्टीचा फायदा चीन घेत आहे. व्हिएतनाममधून अशाप्रकारचे सेट टॉप बॉक्सची सुद्धा भारतात निर्यात केली जात आहे. त्याचप्रमाणे चीन व्हिएतनाममध्ये वस्तूंचे उत्पादन करून, तो माल अमेरिका व युरोपीय देशांना धाडत आहे. याचे कारण, अमेरिका व ईयू म्हणजेच युरोपियन युनियनने चिनी कंपन्यांवर उच्च कर लावले आहेत. कंबोडिया, मलेशिया, थायलंड आणि व्हिएतनाम या देशांत चिनी सोलर पॅनलची निर्मिती करत नुकतेच जाणीवपूर्वक नवे कर लावले आहेत.



## आजची चित्रोळी

हलकें करण्या दुसऱ्याच्या दु:खा
आपण व्हावें पाठिशीं !
चित्र बदलते तर मग त्याचें
असें धरावें पोटाशीं !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### शिक्षकांमध्ये जग बदलण्याची ताकद...

इमारतींपेक्षा शिक्षकांवरून शाळेचे महत्त्व ठरते असे सांगून खडू आणि छडीच्या जोरावर आयुष्याची शिडी चढण्यास शिकविणाऱ्या शिक्षकांचे त्यांनी अभिनंदन केले. ॲड.नार्वेकर म्हणाले, 'वाचाल तर वाचाल' असे नेहमी म्हटले जाते. परंतु जो वाचायला शिकवतो तो समाज घडवतो, यामुळे चांगला समाज घडविण्यामध्ये शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे. शासनाने शिक्षण क्षेत्राला प्राधान्य दिले असून देशाला जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्यासाठी अग्रेसर होण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील शिक्षणाचा दर्जा वाढून गुणवंत महाराष्ट्र घडविण्यात शिक्षकांचे योगदान मोलाचे असणार आहे. यासाठी शासनामार्फत विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांना सर्व सोयी सुविधा पुरविण्यात येत असल्याचे सांगून मंत्री श्री.केसरकर यांनी यावेळी शालेय शिक्षण विभागामार्फत घेण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली. ते म्हणाले, शिक्षकांसाठी टप्पा अनुदान लागू करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यात आले आहे. डिसेंबर ऐवजी जून महिन्यापासून हा टप्पा लागू करण्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत लवकरच निर्णय घेण्यात येईल. शिक्षक भरतीला सुरूवात करून पहिल्या टप्प्यात ३० हजार शिक्षकांची भरती करण्यात येत आहे. ग्रंथपाल, शिक्षण सेवक यांच्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यात आले आहेत. शिक्षकांच्या निवृत्ती वेतनाबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला असून त्यांना यापुढे निवडणूक आणि जनगणनेव्यतिरिक्त अशैक्षणिक कामे देण्यात येणार नसल्याचे त्यांनी सांगितले. मंत्री श्री.केसरकर म्हणाले, शासनाने सर्व विद्यार्थिनींना मोफत शिक्षणाचा निर्णय घेतला आहे. आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना गणवेश, बूट आणि सॉक्स देण्याचा निर्णय घेण्यात आला. पोषण आहारात अंडी, केळी, तृणधान्य देण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार मिळावा तसेच शेतीची माहिती व्हावी यासाठी परसबाग योजना राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यात आले. व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात येत असून जर्मनीमध्ये रोजगारासाठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. महावाचन उत्सव अभियानाअंतर्गत एक लाख शाळा आणि एक कोटी विद्यार्थी सहभागी होतील असे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

श्रीमती कुंदन मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, शिक्षक हे समाजाचे आधारस्तंभ आहेत. आज आपण १०९ शिक्षकांना पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करीत आहोत. राज्यातील दोन शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळाला, ही अभिमानाची बाब असल्याचे सांगून शालेय शिक्षण विभागाच्या विविध उपक्रमात शिक्षक हे नेहमीच स्वयंस्फूर्तीने काम करतात, त्यांना वेळोवेळी येणाऱ्या अडचणीही विभागामार्फत सोडविण्याचे काम केले जात असल्याचे त्या म्हणाल्या.

श्री.मांढरे यांनी प्रास्ताविकाद्वारे शिक्षक पुरस्काराविषयी माहिती दिली. शिक्षक कधीच माजी होत नाहीत. ते विद्यार्थ्यांसाठी कायम माझे शिक्षकच राहतात, असे त्यांनी सांगितले. अनेक शिक्षकांनी विविध क्षेत्रात विक्रम प्रस्थापित केले असल्याची माहिती त्यांनी दिली. समाजाची नि:स्वार्थ भावनेने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन देण्याच्या व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने दरवर्षी राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येतात. पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांना प्रवर्गनिहाय प्राथमिक- ३८, माध्यमिक- ३९, आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे शिक्षक (प्राथमिक)- १९, थोर समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार- ८, विशेष शिक्षक कला/क्रीडा (१+१)- २, दिव्यांग शिक्षक / दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षक- १, स्काऊट/गाईड (१+१)-२ अशा एकूण १०९ शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### ठाण्यात १५८ गणेशोत्सव मंडळे मंडप...

या नियमावलीनुसार मंडळांना पालिका प्रशासनाकडे मंडप उभारणीसाठी अर्ज करावे लागतात आणि त्याची पाहाणी करून पालिका प्रशासन मंडप उभारणीस मंजुरी देते. यामध्ये वाहतूक पोलिस, स्थानिक पोलिस आणि अग्निशमन विभागाचे ना हरकत दाखले मंडळांना घ्यावे लागतात. या दाखल्यानंतरच मंडप उभारणीची अंतिम परवानगी पालिकेकडून दिली जाते. परंतु या प्रक्रियेमुळे परवानगी मिळण्यास उशीर होत असल्याने मंडळांना मंडप उभारणीस कमी कालावधी मिळायचा. त्यामुळे ही प्रक्रीया अधिक सुलभ करण्यासाठी पालिकेने मंडळांच्या मागणीनुसार एक खिडकी योजना राबविण्यास सुरूवात केली. तसेच पालिकेने ऑनलाईन आणि ऑफलाईनद्वारे अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देत आहे. यंदाही अशीच सुविधा पालिकेने मंडळांना उपलब्ध करून देण्यात आली असली तरी त्यात विलंब होताना दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर मंडळांकडून परवानगीसाठी आलेले अर्ज सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस, वाहतूक पोलीस, अग्निशमन दल यांच्याकडील आवश्यक परवानगी, ना हरकत दाखला घेवून प्रभाग समिती स्तरावर तत्काळ मार्गी लावावेत. किती परवानगी देण्यात आली, त्यात काही विलंब होत नाही ना याचा सहायक आयुक्त आणि परिमंडळ आयुक्त यांनी दैनंदिन स्वरूपात आढावा घ्यावा, असे आदेश अतिरिक्त आयुक्त रोडे यांनी दिले होते. यानंतरही अवघ्या दोन दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपलेला असतानाही १५८ मंडळे परवानगीच्या प्रतिक्षेत असल्याचे समोर आले आहे. या संदर्भात ठाणे महापालिकेचे उपायुक्त जी. जे. गोदेपुरे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. ठाणे महापालिकेकडे गणेशोत्व मंडळांनी ऑनलाइन पद्धतीने १२२ अर्ज दाखल केले असून त्यापैकी ८४ अर्जांना मंजुरी मिळाली आहे. तर, ऑफलाइन पद्धतीने १८५ अर्ज दाखल झाले असून त्यापैकी ६५ अर्जांना मंजुरी मिळालेली आहे. उर्वरित १५८ मंडळांना अद्याप परवानगी देण्यात आलेली नसून या मंडळांना परवानगी देण्याची प्रक्रीया सुरू असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

### महाराष्ट्राचा स्वाभिमान मोदीकडे गहाण ठेवू...

शिक्षणाबरोबर दुष्काळी भाग अशी ओळख असलेल्या पलुस कडेगाव भागाचा कायापालटही पंतगराव कदम यांनी केला आहे, असे पवार म्हणाले. ँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले म्हणाले की, पतंगराव कदम हे सर्वसामान्यांसाठी प्रेरणास्थान आहेत, सामान्य कुटुंबात जन्माला आलेले पतंगराव कदम स्वकर्तृत्वाने मोठे झाले. पलूस कडेगाव भागात त्यांनी आरोग्य, शिक्षण, कृषी क्षेत्रात विविध कामे करून या भागाचा विकास केला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम यांनी केले. या कार्यक्रमाला अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस सरचिटणीस मुकुल वासनिक, प्रभारी रमेश चेन्नीथला, विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, खा. छत्रपती शाहू महाराज, विधान परिषदेतील गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, CWC सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खा. प्रणिती शिंदे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, गोवा दिव दमनचे प्रभारी माणिकराव ठाकरे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, माजी आमदार मोहनदादा कदम, सांगली जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. विक्रम सावंत, सांगली शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील आदी उपस्थित होते.

# तूच कर्ता आणि करविता - विघ्नहर्ता

गणेश चतुर्थी हे मराठी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी गणेश याचा जन्म भाद्रपद शुक्ल चतुर्थीला झाला असे मानले जाते. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा "शिवा" असेही म्हणले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे. स्त्रीमनाचे लोकदैवत असे ही श्री गणेशाला मानतात. गणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. पत्रकारितेच्या इतिहासातील प्रखर तेजस्वी सूर्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या नांवे 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकारांना मिळतो. याचाच अर्थ असा लो. टिळकांच्या राष्ट्रभक्ति, लोकशक्ति आणि अन्याय मुक्तिला वाहिलेल्या ओजस्वी पत्रकारितेचे परंपरा आजही अखंड अविरत चालू आहे असाच होतो.

लोकमान्य टिळक हे ब्रिटिश सरकार बद्दल लोकांच्या मनात असंतोष निर्माण करणारे नेते म्हणून एकीकडे कार्य करीत होते. त्याचवेळी त्यांचा आवडत्या विषयांचा अभ्यासही चालू होता. त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवर सामाजिक परिस्थितीवर आणि प्रासंगिक घटनांवर 'केसरी'तून लेख करतानांही टिळकांनी आर्यांचे वस्तिस्थान 'ओरायन' शास्त्रीय पंचांग 'गितारहस्य' असे ग्रंथ लिहून आपल्या अभ्यासाचा परिचय घडविला. यापुढील काळात सामाजिक सुधारणेच्या प्रश्नावरुन टिळक व आगरकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात लोकमान्य टिळकांनी 1894 साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक, सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढयाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सावाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय संस्कृतीत प्रत्येक तत्व मनावर ठासविण्यासाठी काही प्रतिके सांगीतलेली आहेत. आम्हाला बाप्पा तू सद्सदविवेक बुध्दीचे प्रतिक वाटतोस. चांगल्या वाईटाचा सत्य-असत्याचा, पाप-पुण्याचा निवाडा करण्याची क्षमता देणारा तू देव आहेस. म्हणुनच तुला बुध्दीदाता म्हटले जाते. आज समाजाला या सद्सद्विवेक बुध्दीदात्या श्री गणेशाची पूर्वी कधी नव्हती एवढी आज गरज आहे. कारण आजवर नव्हता एवढा समाज अध: पतनाच्या उंबरठयावर उभा आहे. तुझ्यापुढे उभे राहिल्या वर माणसाच्या मनातल्या सद्भावना, सहानुभुती, सहृदयता, सज्जनता, सद्विचार, समभावना, सहभावना जाग्या होतात आणि तो 'मी' ऐवजी 'आपण' 'माझे' ऐवजी 'आपले' असा विचार करायला आपण प्रवृत्त होतो, हेच तुझे अवतार कार्य आहे.

भारतीय संस्कृतीत मूर्ती पूजाही एक थोर आणि मधुर अशी कल्पना आहे. माणसाला स्वत:चा उतरोत्तर अधिक विकास करुन घेता यावा म्हणुन जी अनेक साधने भारतीय संस्कृतीने निर्माण केली, त्यातील एक आहे मूर्तीपूजा. मनुष्य प्राणी हा जन्मत: च विभूती पूजक आहे. आपल्या पेक्षा जे मोठे आहेत, त्यांचे आपण कौतूक करतो. आपल्याहून जे थोर आहेत बुध्दीने, प्रतिमेने, विचाराने महान आहेत त्यांची पूजा करावी असे माणसाला वाटते. ही पूजा आपण त्यांच्या आदर्शाची करतो, म्हणूनच त्या आदर्शाचे अनुकरण करण्याची प्रेरणा मनाला कार्य प्रवृत्त करते.

बाप्पा! तुझ्या आगमनानं आज सारं महाराष्ट्र राज्य रोमांचित, हर्ष भरित झालं आहे. खरोखरंच राज्याची काही पुण्याई आहे, म्हणुन "संभवामि, युगे-युगे" असे म्हणत. हजार पाचशे वर्षातून केव्हा तरी एकदा अवतार घेणारा परमेश्वर, दरवर्षी नित्य-नेमाने तुझ्या रुपाने या राज्यात अवतरतो. तेव्हा गहिवरुन येतं, तुझ्या नुसत्या दर्शनाने पोर्णिमेच्या चंद्राला पाहुन सागराला भरती यावी, तशी जन सागराला उचंबळुन भावनांची भरती येते. तुझ्या नुसत्याना मोच्चाराने जीवनातील दुख: संकटे, विघ्ने, अडचणी, प्रश्न, समस्यायांना सामोरे जाण्याची शक्ति-स्फुर्ती लाभते. तुझ्या नामस्मरणात अपारसाम आहे. भारतीय संस्कृतीचे मांगल्य, तुझ्या मुर्तीत एकवटलेले आहे. उत्तुंग आणि भव्य तुझ्या मुर्तीमध्ये आम्हाला हिमालयाच्या गिरी शिखरावरील शिव, कन्याकुमारीच्या तेजस्विनीचे सौंदर्य आणि वेद-उपनिषद-रामायण-महाभारतातील, सत्याचा म्हणजे सत्य-शिव-सुंदरतेचा प्रत्यय येतो. शिवाची शक्ति, सत्त्याचे सामर्थ्य आणि सौंदर्यातील ममत्व तुझ्या ठायी सामावलेले आहे. म्हणुनच तु भक्तांच्या नवसाला पावतोस, त्यांची मनोकामना पूर्ण करतोस, त्यांच्यावरील संकटाचे निवारण करतोस कारण तू जगज्येठी आहेस, तूच कर्ता-करवीता आहेस.

तुझ्या ठायी, ज्ञान-भक्ति आणि कर्मयांचा हृदय यंगम संगम आहे. तू खरा उदारदाता आहेस, मेघ जसे सारे पाणी देऊन टाकतात, झाडे-फळे देऊन टाकतात, फुले सुगंध देऊन टाकतात, नद्या ओलावा देऊन टाकतात, सुर्य-चंद्रप्रकाश देतात. तूही 'जो-जो वांछिले, तो तेलाहो' म्हणत साऱ्या भक्तांची इच्छापूर्ती करतोस. तू समाजाती लदंभ, आळस, अज्ञान, रुढी, भेद्र-भाव, उच्च निंच पणा, वौमनस्य, दारिद्रय, दु:ख, दैन्य, दुबळेपणा, भ्याडपणा दुर व्हावा. यासाठी तुझ्या विचारांचे, प्रेरणांचे अधिष्ठान, ही आजच्या समाजाची गरज आहे.

तुझ्या आगमनाने राज्याचे रुपांतर दहा दिवसांकरीता अक्षरश: तिर्थक्षेत्रात होते, अख्खा महाराष्ट्र ढवळून निघतो. सारेजण धर्म-भाषा, जाती-पंथ प्रदेश असे सारे भेद विसरुन तुझ्या दर्शनाच्या रांगेत 'भाविक' येतो, या एकाच जातीचे असतात. मनाची क्षुद्रता गळून पडलेली असते, जीवनाला सुंदर करणारे आणि मनाला सुखी करणारे असे ते रुप बाप्पा सर्वांच्यापुढे असते. दु:खाचा, समस्या, संकटाचा विसर पडलेला असता. आनंद, उत्साह, चैतन्य यांनी रोम-रोम पुलकित झालेला असतो. एका तेजाची उपासना आपण करीत आहोत, या अनुभवातून सारे गणेश भक्त तुझ्या सानिध्यात आल्यावर जात असतात. तू बुध्दीचा देव आहेस, परमेश्वर म्हणजे ज्ञान अशी आमची भारतीय संस्कृती सांगते. आम्ही सारे आस्तिक आहोत. कारण आमची तुझ्या जागृत अस्तित्वावर श्रध्दा आहेत. पण तुझे सामर्थ्य असे अगाध आहे की, तुझ्या दर्शनाने नास्तिकांचे ही रुपांतर आस्तिकात होईल. पाप्याला आपल्या पापाची लाज वाटेल, भ्रष्टाचा ज्याला शरम वाटेल हा तुझा महिमा आहे, म्हणुन तू आमच्यासाठी वरदान आहेस. जेव्हा आम्ही पाहतो, तेव्हा गणेशोत्सव, सुरु करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या स्वप्नांची पूर्ती बाप्पा तूझे सेवक, सामाजिक बांधिलकेच्या भूमिकेतून करतांना पाहून आम्हा भक्तांचा हात अधिक देण्यासाठी आणि ऋण फेडण्यासाठी उतावीळ होतो.

अयोग्य कर्मापासून रोखतेही, मूर्तीपूजा हे मानसीक, बौध्दीक विकासाचे साधन हजारो वर्षापासून आहे. म्हणूनच बाप्पा तुझे 'अस्तित्व' चिरंतन आहे. हे ठाऊक असुनही आम्ही गणेश चतुर्थीला तुझी मूर्ती आनंदाने, अभिमानाने मिरवत देहभान विसरुन, गात-नाचत दहा दिवसांकरीता आणतो, आणि प्राणांच्या ज्योती करुन तुझ्या तेजाची आरती करतो. त्यासाठी आम्हाला तू मूर्तीरुपात हवा असतोस. तू विराट विश्वंभर आहेस, पण आम्ही तूझे पाईक आहोत. आमचे सर्व संकटापासुन ती येण्या आधीच रक्षण-निवारण कर आम्हाला सुख-समाधान, मन: शांती, आरोग्य, समृध्दि, समता-बंधुता-न्याय लाभू दे, हीच तुझ्या चरणी प्रार्थना!



ठाणे - गणेशोत्सवानिमित्त गावी जाण्यासाठी राज्यपरिवहन च्या वतीने विशेष गाडी चे आयोजन केले आहे त्यात शिवसेनेच्या वतीने मोफत गावी जाण्याकरिता गाड्या खारेगाव येथील भूमिपुत्र मैदानात उभ्या केलेल्याचे चित्र दिसत आहे.



**ठाणे** - गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवरती भिवंडी, खारबाव येथून डोंगरी भागातून आदिवासी महिला विविध प्रकारचे पूजासाहित्य घेऊन विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने केवडा, आंब्याची पाने, हराळी, बेल, दुर्वा शमी, काकडी, केळीचे खांब, केळीचे पान यासह विविध गोष्टींचा विक्रीसाठी ठाणे बाजारपेठेत उपलब्ध आहेत.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# जिल्ह्यातील 15 शिक्षकांना जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार



**ठाणे** - जिल्हा परिषदे मार्फत देण्यात येणारा "जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२४-२५" सोहळा आज बी. जे हायस्कूल येथे पार पडला. शिक्षकदिनाचे औचित्य साधून १५ शिक्षकांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून मागील दोन वर्षातील जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्काराने शिक्षकांचा देखील सन्मान करण्यात आला आहे.

याप्रसंगी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करत आहोत. शिक्षकांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी आपण दिशा प्रोजेक्ट, एफ. एल. एन, वोपा टूल असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना उंचावर घेऊन जाण्यासाठी नवीन तंत्रज्ञानांची जोड घेऊन आपले उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोलाचं योगदान शिक्षकांनी द्यावे. पुरस्कार प्राप्त शिक्षकांना अभिनंदन करत कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींना देखील शिक्षक दिनाच्या शुभेच्छा यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या. शिक्षकांनी या शैक्षणिक वर्षात आपल्या प्रत्येक विद्यार्थ्यास वाचन, लेखन, संख्याज्ञान इ. दिशा प्रोजेक्टच्या स्तर निश्चितीनुसार असावी अशी अपेक्षा मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केली.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने पुरस्कार प्राप्त शिक्षकांना शिक्षक दिनाच्या सदिच्छा दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवताना शिक्षण क्षेत्रातील योगदान देणाऱ्या शिक्षकांचा सन्मान सोहळा ५ सप्टेंबर रोजी पार पाडतोय ही आनंदाची बाब आहे. आई-वडील, शिक्षक आयुष्यात सकारात्मक बदल करत ज्ञानदानाचे काम करत असतात अशा सर्व शिक्षकांना सदिच्छा, असे मार्गदर्शन उप मुख्य कार्यकारी (सामान्य प्रशासन विभाग) अविनाश फडतरे यांनी केले.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, भातसई येथील विद्यार्थ्यांनी ज्ञानज्योत पेटवणाऱ्या शिक्षकांसाठी गीत सादरीकरण केले. विभागीय आयुक्तांच्या मान्यतेने पुरस्कार निवडीचे निकषाच्या आधारे तीन वर्षातील १५ शिक्षकांचा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आज पार पडला.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात शिक्षक म्हणून मोलाचं काम करणाऱ्या शिक्षकांमुळे तळागाळातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात राहतात, शिक्षणाची गोडी वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येतात त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्याना वाव मिळण्यास मदत होते. शालेय स्तरावर विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार वितरण करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जोमाने काम करा, असे आवाहन प्रास्ताविक करताना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले यांनी केले.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी (योजना) भावना राजनोर, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) कुंदा पंडित, उपशिक्षणाधिकारी वैशाली हिरडे, सर्व गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी, मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

पुरस्कार प्राप्त शिक्षक अनघा आनंद सोनकांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना जिल्हा परिषदेचे आभार मानले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक म्हणून देश घडवण्यासाठी मोलाचं योगदान देणाऱ्या शिक्षकांना सन्मान सोहळा म्हणजे कौतुकाची थाप आहे असे मनोगत व्यक्त केले.

विस्तार अधिकारी शिक्षण आशिष झुंजारराव यांनी उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गंगाराम ढमके, राजश्री पाटील यांनी केले.

जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक

सन २०२२-२३ वर्षातील जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक – अबंरनाथ तालुक्यातील सहा. शिक्षिका अनघा आनंद सोनकांबळे, भिवंडी तालुक्यातील मुख्याध्यापिका पुष्पलता काशिनाथ गायकवाड, कल्याण तालुक्यातील पदवीधर शिक्षक आत्माराम बाळाराम पागडे, मुरबाड तालुक्यातील पदवीधर शिक्षक अरुण विनायक गोडांबे, शहापूर तालुक्यातील सहा. शिक्षक डॉ. हरिश्चंद्र तुकाराम भोईर

सन २०२३-२४ वर्षातील जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक – अबंरनाथ तालुक्यातील प्राथमिक शिक्षक सुचित्रा राजेंद्र सोनार, भिवंडी तालुक्यातील प्राथमिक शिक्षक विलास अनंता पाटील, कल्याण तालुक्यातील प्राथमिक शिक्षक श्रद्धा सुनिल पवार, मुरबाड तालुक्यातील प्राथमिक शिक्षक अशोक महादू रोठे, शहापूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षक सुधीर पुंडलिक भोईर

सन २०२४-२५ वर्षातील जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक – अबंरनाथ तालुका तालुक्यातील प्राथमिक शिक्षक गणपत शंकर धुरी, भिवंडी तालुक्यातील प्राथमिक शिक्षक अर्चना अनंता पाटील, कल्याण तालुक्यातील प्राथमिक शिक्षक चतूर महारू वाघ, मुरबाड तालुक्यातील प्राथमिक शिक्षक डॉ. प्रशांत तुकाराम माळी, शहापूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षक शेखर शिवराम घोडविंदे.

# ठाण्यातील १७ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार




**ठाणे** - ठाणे महानगरपालिकेतर्फे शिक्षक दिनाच्या निमित्ताने, महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमधील एकूण १७ गुणवंत शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४' देऊन सन्मानित करण्यात आले. त्यात महापालिका शाळांतील १३ तर खाजगी अनुदानित शाळांतील ०४ शिक्षकांचा समावेश आहे. अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार यांच्या हस्ते सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

शिक्षकांच्या योगदानाचा उल्लेख करून अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी पुरस्कारप्रात्प शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच, महापालिकेकडून शिक्षण विभागासाठी घेतल्या जात असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला.

या सत्कारापूर्वी झालेल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ दा. कृ. सोमण यांनी पुढील पिढी सक्षम आणि उत्तम घडविणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा शिक्षकदिनी गौरव करण्याची उज्ज्वल परंपरा कायम राखल्याबद्दल महानगरपालिका प्रशासनाचे अभिनंदन केले. तसेच, 'विज्ञानमंच' अंतर्गत विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग हा उत्साह वाढविणारा असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा ध्यास घेतलेल्या शिक्षकांच्या कार्याचा उचित गौरव करण्यात येत आहे. ही गोष्ट अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन सोमण यांनी केले.

शिक्षकांनी शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करून आजच्या तंत्रयुगातील विद्यार्थी घडविणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांचा सन्मान करण्याची संकल्पना उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार यांनी मांडली आहे. त्यानुसार, या कार्यक्रमात प्रत्येक गटातील एक याप्रमाणे आठ शिक्षकांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्तविक शिक्षणाधिकारी जोत्स्ना शिंदे - पवार यांनी केले. त्यांनी ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या कार्याचा आढावा घेतला. तसचे, विद्यार्थी विकासासाठी उत्तम कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला.

या कार्यक्रमास, ठाणे जिल्हा शिक्षक सेनेचे अध्यक्ष सुनील फापाळे, ठाणे पालघर शिक्षक पतपेढीचे माजी अध्यक्ष बाबाजी फापाळे, ठाणे पालघर पतपेढीचे जगन्नाथ जाधव आदी उपस्थित होते. शिक्षण विभागाचे अधीक्षक विजय साळवे, गटाधिकारी संगिता बामणे व लेखाधिकारी संदीप कदम तसेच सर्व गटप्रमुख यांच्या नेटक्या नियोजयामुळे हा कार्यक्रम उत्तमरीत्या संपन्न झाला. यु आर सी १ व २ चे प्रमुख, समग्र शिक्षाचे प्रकल्प अधिकारी, सर्व सी आर सी केंद्र प्रमुख यांचेही कार्यक्रमास सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाणे मनपा शाळा क्र. २३चे शिक्षक सुरेश पाटील आणि सी आर सी केंद्र क्र. च्या केंद्र समन्वयक नीलिमा पाटील यांनी नेटकेपणाने केले.

## पुरस्कारप्राप्त शिक्षक आणि शाळा

१. प्रकाश बाविस्कर, ठामपा शाळा क्र. १९, विष्णूनगर
२. रसिका गायकवाड, ठामपा शाळा क्र. ६४, मानपाडा
३. माधुरी देसले, ठामपा शाळा क्र. १२०, सावरकर नगर
४. सविता शिंदे, ठामपा शाळा क्र. १३, खोपट
५. चैताली भंडारे, ठामपा शाळा क्र. २९, महात्मा फुले नगर
६. सुरेंद्र देवरे, ठामपा शाळा क्र. ५०, कोकणीपाडा
७. मीरा हाडवळे, ठामपा शाळा क्र. ९८, दिवा
८. विमल दळवी, ठामपा शाळा क्र. ९०, पडले
९. अशोक जैसवार, ठामपा शाळा क्र. ४२, शांतीनगर
१०. संगीता पारपोलकर, ठामपा शाळा क्र. १६, कोपरी
११. विजया भेरे, ठामपा शाळा क्र. ७८, दिवा
१२. रुविना सुर्वे, ठामपा शाळा क्र. ४०, कौसा
१३. सुप्रिया गायकवाड, ठामपा शाळा क्र. १०० कौसा
१४. अरुणा पाटील, ज. ए.ची प्राथमिक शाळा
१५. किशोरी दाभोळकर, ब्राह्मण शिक्षण मंडळ
१६. शेख नुरुन्निसा बेगम हक, अंजूमन खैरुल उर्दू मुलींची शाळा, महागिरी
१७. शुभांगी भोसले, शिवाई विद्यालय प्राथमिक विभाग.



**ठाणे** - गणपती निमित्त खरेदीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणात बाहेर पडल्याने ठाण्यातील अंतर्गत रस्त्यांवर तसेच घोडबंदर रोडवर झालेली वाहतूक कोंडी.



**ठाणे** - गणेशोत्सवनिमित्त ठाण्यातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात आकर्षित कंठी आणि रूळमळ तसेच पूजेचे साहित्य विक्रीसाठी आले आहेत.





**ठाणे** - बाप्पा चे घर वर्षानुवर्ष बाप्पा राहतात याच घरात , ठाण्यातील दिलीप वैती नावाचा अवलिया जोपासतोय बाप्पांचा छंदयांचा घरात सुमारे १००० ते १५०० गणेश मूर्ती दिलीप वैती यांनी विविध ठिकाणी हुन आपल्या घरी आणले आहे अर्ध इंच पासून पाच फोट परियंत च्या गणेश मूर्ती आहे **- छाया, मनोज सिंह**


# सुदर्शन रापतवार यांनी लिहिलेल्या तीन पुस्तकांचे १५ सप्टेंबर रोजी प्रकाशन

## ना. धनंजय मुंडे, खा. रजनीताई पाटील, डॉ. वृषाली किन्हाळकर, आ. नमिता मुंदडा, राजकिशोर मोदी यांची उपस्थिती

**अंबाजोगाई** - ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी लिहिलेल्या "असामान्य", "सहज सुचलं म्हणून" आणि "मंदीराचे गाव" या तीन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळा १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता नगर परिषदेच्या आद्य कवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळयास साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन लेखक सुदर्शन रापतवार, माध्यम पब्लिकेशन आणि माध्यम डिजिटल न्यूज नेटवर्क यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या तीन पुस्तकांच्या प्रकाशन सैहळयासाठी राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे साहेब, राज्यसभेच्या सदस्य रजनीताई पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वृषालीताई किन्हाळकर, आ. नमिता अक्षय मुंदडा आणि महाराष्ट्र राज्य स्थानिक स्वराज्य संस्थेचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी हे उपस्थित राहणार आहेत.

ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी आपल्या प्रदीर्घ पत्रकारीतेच्या अनुभवातुन सिध्द झालेल्या प्रगल्भ विचार आणि समग्र लेखणीतून लिहिलेल्या "असामान्य", "सहज सुचलं म्हणून" आणि "मंदीराचे गाव" ही तीन ही पुस्तकं माध्यम पब्लिकेशन च्या वतीने प्रकाशित करण्यात आली आहेत. अंबाजोगाई सारख्या अर्धशहरी विभागात




राहुन ही पुस्तकं निर्मितीच्या क्षेत्रात पहिल्यांदाच पाऊल ठेवलेल्या माध्यम प्रकाशनाने ही तीन ही पुस्तकांची निर्मिती अतिशय दर्जेदार पध्दतीने केली आहे.

सलग चाळीस वर्षे सकारात्मक पत्रकारीतेला खतपाणी घालणाऱ्या सुदर्शन रापतवार यांचे साहित्य निर्मितीतील हे पहीलेच पाऊल असून एकाच वेळी तीन पुस्तकांचे लिखाण करुन त्यांचे प्रकाशन करण्याचा हा त्यांचा धाडसी प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

नगर परिषदेच्या आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या प्रकाशन सोहळयास साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन लेखक सुदर्शन रापतवार, माध्यम पब्लिकेशन आणि माध्यम डिजिटल न्यूज नेटवर्क या संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### मराठवाड्यातील पहिला प्रयत्न

ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी लिहिलेल्या तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा हा मराठवाड्यातील पहिलाच उपक्रम ठरावा असा आहे. एका पत्रकाराने लिहिलेल्या, त्याच पत्रकाराच्या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या एकाच कार्यक्रमात प्रकाशन होणारा हा तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा हा पहिलाच उपक्रम ठरेल.



ठाणे महानगरपालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात, भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनाच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.




# क्रिकेटर रवींद्र जडेजाने राजकारणात ठेवले पाऊल



भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करून राजकारणात पाऊल ठेवले आहे. स्टार क्रिकेटरची पत्नी रिवाबा जडेजा आधीपासून गुजरातमधील जामनगरमधून भाजपच्या आमदार आहेत. अलीकडेच रिवाबाने सोशल मीडियावर ही बातमी शेअर केली आणि रवींद्र जडेजा अधिकृतपणे भाजपचा सदस्य झाला असल्याचे सांगितले. यासह त्याचे सदस्यतापत्रही तिने जोडले आहे. रिवाबाने नुकतीच जडेजाबद्दलची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअर केली आहे. तिने एका पोस्टद्वारे सांगितले की, रवींद्र जडेजाने भाजपचे सदस्यत्व घेतले आहे. जडेजाने अलीकडेच २०२४ च्या टी२० विश्वचषकानंतर या फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली होती. रवींद्र जडेजाने पत्नी रिवाबाबरोबर अनेकदा प्रचार केला आहे. निवडणुकीदरम्यान तो पत्नी रिवाबासोबत भाजपचा प्रचार करताना दिसला आहे. दोघांनी अनेक रोड शोही केले.

# फरहान अख्तर दिसणार सैनिकाच्या भूमिकेत, भारत-चीन दरम्यानच्या 1962 च्या युद्धावर आधारित असणार '120 बहादूर'






अभिनेता आणि दिग्दर्शक फरहान अख्तरने कधी पडद्यामागे राहून तर कधी पडद्यावर येऊन अनेक उत्तम कलाकृती बॉलीवूडला दिल्या आहेत. त्यामध्ये 'दिल चाहता है', 'लक्ष्य', 'डॉन' या सिनेमात पडद्यामागे दिग्दर्शक म्हणून उभा राहून प्रेक्षकांना उत्तम आशय आणि मनोरंजन दिले. तर 'रॉक ऑन' सिनेमातून अभिनेता म्हणून पदार्पण करत, पुढे आलेल्या 'भाग मिल्खा भाग' मधून त्याने आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली. स्टेजवर कधी गायक म्हणून, तर कधी निर्माता म्हणून अशा विविध भूमिकेत असलेला फरहान गेल्या काही दिवसांपासून अभिनेता म्हणून पडद्यावर दिसला नव्हता. मात्र फरहान आता '१२० बहादूर' या नव्या सिनेमात मेजर शैतान सिंग यांच्या भूमिकेत दिसणार आहे.

भारत आणि चीन यांच्यादरम्यान १९६२ मध्ये झालेल्या प्रसिद्ध रेझांग लाच्या युद्धावर आधारित हा सिनेमा आहे. फरहानने याआधी 'लक्ष्य' हा कारगिल युद्धावर आधारित सिनेमा दिग्दर्शित केला होता. आता भारतीय सैनिकांवर आधारित '१२० बहादूर' या सिनेमात फरहान सैनिकाची भूमिका साकारत आहे. फरहान अख्तरने ४ सप्टेंबरला त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवरून या सिनेमाची पहिली झलक असलेले पोस्टर शेअर केले. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी रेझांग ला येथे भारत आणि चीनच्या सैन्यात लढाई झाली होती.

फरहानने या सिनेमाचे जे पोस्टर शेअर केले आहे, त्यात त्याची पाठ दिसत असून, त्याच्या हातात बंदूक आहे. त्याच्या समोर हिमालयातील बर्फाच्छादित पर्वत दिसत असून, तो एका पर्वतावर उभा आहे. आजूबाजूच्या पर्वतांवर हल्ल्याचे दृश्य दिसत आहे.

फरहानने हे पोस्टर शेअर करताना लिहिलं, "त्यांनी जे साध्य केले ते कधीही विसरता येणार नाही. परमवीर चक्र विजेते मेजर शैतान सिंग आणि १३ कुमाऊँ रेजिमेंटच्या चार्ली कंपनीच्या सैनिकांची कहाणी सादर करत आहे, ही माझ्यासाठी खूप अभिमानाची आणि सन्मानाची गोष्ट आहे. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी भारत-चीन दरम्यान लढलेली रेझांग लाची प्रसिद्ध लढाई आपल्या शूर सैनिकांच्या अतुलनीय शौर्याची, धैर्याची आणि निस्वार्थीपणाची कहाणी आहे. या अद्भुत कथेला पडद्यावर आणण्यासाठी भारतीय लष्कराचे संपूर्ण सहकार्य मिळाले, याबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहोत."

फरहानच्या या पोस्टवर त्याची पत्नी शिबानी दांडेकरने लिहिले आहे, "मी हा सिनेमा पाहण्यासाठी खूप उत्सुक आहे. संपूर्ण टीमला शुभेच्छा." अर्जुन रामपाल, झोया अख्तर आणि रणवीर सिंग यांनी सुद्धा फरहानला त्याच्या पोस्टवर कमेंट करून सिनेमासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. '१२० बहादूर' या सिनेमाचे दिग्दर्शन रजनीश घई करणार असून, सिनेमाची निर्मिती फरहान अख्तर आणि रितेश सिधवाणी यांची एक्सेल एन्टरटेनमेंट निर्मिती संस्था करणार आहे.

# विद्यार्थी अन् शिक्षकांवर आधारित 'हे' बॉलीवूड चित्रपट, ओटीटीवर आहेत उपलब्ध




आई-वडिलांनंतर मुलांच्या जीवनात शिक्षकांचे महत्त्वाचे स्थान असते. शिक्षक मुलांना आयुष्यात पुढे जाण्यास मदत करतात. गुरु आणि शिष्याचा हा दिवस साजरा करण्यासाठी दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. शिक्षक व विद्यार्थी यांच्या नात्यावर अनेक चित्रपट बॉलीवूडमध्ये तयार झाले आहेत. या यादीत 'तारे जमीन पर', 'श्रीकांत' सारखे अनेक चित्रपट आहेत. यामध्ये एका शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्याचे आयुष्य कसे बदलले हे पाहायला मिळतं.

'तारे जमीन पर' या चित्रपटात ईशान नावाच्या मुलाची गोष्ट दाखवण्यात आली आहे. ईशानला डिस्लेक्सिया नावाचा आजार असतो. त्यानंतर ईशान शिक्षक रामशंकर निकुंभला भेटतो, जो त्याचे वाचन आणि लेखन कौशल्य सुधारण्याचा प्रयत्न करतो. चित्रपटात ईशानची भूमिका दर्शील सफारीने केली आहे, तर त्याच्या शिक्षकाची भूमिका आमिर खानने केली आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे.

**श्रीकांत (Srikanth)**

या वर्षी प्रदर्शित झालेला राजकुमार रावची मुख्य भूमिका असलेला 'श्रीकांत' चित्रपट नेत्रहीन बिझनेसमन श्रीकांत बोल्लाच्या जीवनावर आधारित आहे. राजकुमारने श्रीकांत बोल्लाची भूमिका साकारली होती. श्रीकांतला शिक्षणापासून ते प्रत्येक गोष्टीत संघर्ष करावा लागतो. या संघर्षात त्याची शिक्षिका त्याला मदत करते, ती त्याची साथ सोडत नाही. यात ज्योतिका श्रीकांतच्या शिक्षिकेच्या भूमिकेत आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर पाहता येईल.

**हिचकी (Hichki)**

'हिचकी' हा एक मनाला स्पर्शून जाणारा हिंदी चित्रपट आहे, ज्यामध्ये राणी मुखर्जी टॉरेट सिंड्रोमने ग्रस्त असलेल्या शिक्षिकेच्या भूमिकेत आहे. ती आपल्या विद्यार्थ्यांचे आयुष्य सुधारण्यासाठी किती मदत करते ते या चित्रपटात पाहयला मिळतं. हा चित्रपट प्राइम व्हिडीओवर उपलब्ध आहे.

**सुपर 30 (Super 30)**

'सुपर 30' हा हृतिक रोशनची मुख्य भूमिका असलेला चित्रपट आहे. या चित्रपटात अभिनेत्याने आनंद कुमार नावाचे पात्र साकारले आहे. तो मुलांना आयआयटी प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी कशी मेहनत घेतो ते या चित्रपटात पाहायला मिळते. हा चित्रपट हॉटस्टारवर पाहता येईल.

**एमएस धोनी (MS Dhoni)**

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूतने 'एमएस धोनी: द अनटोल्ड स्टोरी' या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली होती. हा चित्रपट धोनीचा बायोपिक आहे. या चित्रपटातही त्याच्या शिक्षकांनी धोनीतील क्रिकेटचे कौशल्य कसे ओळखले आणि त्याला खेळण्याची संधी दिली हे पाहायला मिळतं. हा चित्रपट हॉटस्टारवर उपलब्ध आहे.

# २ सुवर्ण आणि २ रौप्य, भारताच्या पॅरा खेळाडूंनी पॅरिसमध्ये घडवला इतिहास, तिरंदाजीत पदकाला गवसणी



पॅरिस येथे सुरू असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय पॅरा ॲथलीट सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करताना दिसत आहेत. ४ सप्टेंबर म्हणजेच सातव्या दिवशी भारताने दोन सुवर्णपदके आणि २ रौप्यपदक पटकावली आहेत. भारताने पहिल्यांदाच पॅरा तिरंदाजी आणि क्लब थ्रोमध्ये सुवर्णकामगिरी केली तर गोळाफेकमध्ये भारताने ४० वर्षांनंतर पदक पटकावले.

मराठमोळ्या सचिन खिलारीने सातव्या दिवशी पदकांचा सिलसिला सुरू केला. भारताच्या सचिन खिलारीने पुरुषांच्या गोळाफेक F46 प्रकारात रौप्य पदक जिंकले आहे. यानंतर भारताच्या हरविंदर सिंहने पॅरा तिरंदाजी सिंगल्समध्ये सुवर्णपदक पटकावले. तर भारताच्या धर्मबीरने क्लब थ्रोच्या F51 प्रकारात सुवर्णपदक जिंकले आहे. याच स्पर्धेत प्रणव सुरमाने रौप्यपदक पटकावले आहे.

सचिन खिलारीने पुरुषांच्या गोळाफेक F46 प्रकारात रौप्य पदक जिंकले आहे. या रौप्य पदकासह, सचिन ४० वर्षांत पॅरालिम्पिकमध्ये गोळाफेक प्रकारात पदक जिंकणारा पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरला आहे.

# दिनविशेष

**घटना**

२०२२: कोविड-१९ महामारी भारताने कोविड- १९ अनुनासिक (Nasal Vaccine) लस मंजूर केली आणि चीननंतर असे करणारा दुसरा देश बनला.
२०२२ : लिझ ट्रस - युनायटेड किंगडमच्या पंतप्रधान बनल्या.
१९९७: अमेरिकेच्या नॅशनल एन्डाऊमेंट फॉर द आर्टस संस्थेची सरोदवादक अमजद अली खान यांना नॅशनल हेरिटेज फेलोशिप मिळाली.
१९९३ : ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांची कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या जनस्थान पुरस्कारासाठी निवड.
१९६८ : स्वाझीलँड हा देश स्वतंत्र झाला.
१९६६: दक्षिण आफ्रिकेच्या पंतप्रधान हेन्ड्रिक व्हेरवोर्डची संसदेत भोसकून हत्या.
१९६५: पहिल्या भारत पाकिस्तान युद्धाची सुरुवात झाली.
१९५२ : कॅनडातील पहिले दूरचित्रवाणी केंद्र मॉंट्रिअल येथे सुरू झाले.
१९३९: दुसरे महायुद्ध दक्षिण अफ्रिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.

**जन्म**

१९७१: देवांग गांधी - भारतीय क्रिकेट खेळाडू १९६८ : सईद अन्वर पाकिस्तानी फलंदाज
१९५७ : जोशे सॉक्रेटिस पोर्तुगालचे पंतप्रधान
१९२९: यश जोहर भारतीय चित्रपट निर्माते (निधन २६ जून २००४)
१९२३ : पीटर (दुसरा) युगोस्लाव्हियाचे राजा
१९२१ : नॉर्मन जोसेफ वोडलँड - बारकोडचे सहनिर्माते (निधन: ९ डिसेंबर २०१२ )
१९२१ : नॉर्मन जोसेफ व्हाउडलँड बार कोडचे सहसंशोधक (निधन: ९ सप्टेंबर २०१२ )
१९१५ : फ्रांझ जोसेफ स्ट्रॉस बव्हेरियन लेफ्टनंट आणि राजकारणी, बव्हेरिया देशाचे मंत्री अध्यक्ष ( निधन: ३ ऑक्टोबर १९८८)
१९०१: कमलाबाई रघुनाथ गोखले- भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री कलाकार (निधन: १८ मे १९९७)
१८९२: सर एडवर्ड ऍपलटन ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पुरस्कार

**मृत्यू**

२०२२ : अरविंद गिरी भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (जन्म: ३० जून १९५८)
२०२२: उमेश कट्टी - भारतीय राजकारणी, कर्नाटकचे आमदार (जन्म: १४ मार्च १९६१)
२०१९: रॉबर्ट मुगाबे - झिम्बाब्वे देशाचे २रे राष्ट्रपती (जन्म: २१ फेब्रुवारी १९२४)
२००७: लुसियानो पाव्हारॉटी - इटालियन ऑपेरा गायक
१९९० : लेन हटन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ जून १९१६)
१९७९ : पी. के. मुकिया तेवर ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे अध्यक्ष (जन्म: ४ एप्रिल १९२३)
१९७८ : अडॉल्फ डॅस्लर ऍडिडासचे संस्थापक (जन्म: ३ नोव्हेंबर १९००)

# गेल्या १२ वर्षांपासून रोज फक्त ३० मिनिटे झोपतो 'हा' जपानी माणूस!



कल्पना करा की, तुम्ही १० वर्षांपासून फक्त ३० मिनिटे झोपत आहात आणि तरीही सर्व कामे व्यवस्थितपणे करीत आहात. ही कल्पनाच किती आश्चर्यकारक आहे, हो ना. पण जपानमधील ह्योगो येथील ४० वर्षीय जपानी व्यावसायिक डायसुके होरी (Daisuke Hori) यांनी असा दावा केला आहे, "गेल्या १० वर्षांपासून रोज फक्त ३० मिनिटे झोपत आहे."

'साऊथ चायना मॉर्निंग पोस्ट'ला दिलेल्या माहितीनुसार होरी यांनी सांगितले, "कमी वेळ झोपण्याची ही दिनचर्या ही दीर्घायुष्य मिळविण्याची एक पद्धत आहे." चांगल्या आरोग्यासाठी प्रौढ व्यक्तीला ६-८ तासांची झोप मिळणे आवश्यक आहे, याबाबत बहुतांश लोकांची सहमती आहे; पण होरी यांचे मत मात्र वेगळे आहे. होरी ठामपणे सांगतात, "कमी झोपण्यामुळे काम करण्याची कार्यक्षमता आणि एकंदर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते."

जागे राहण्यासाठी होरी आपल्या दिनचर्येत नेहमीपेक्षा वेगळ्या गोष्टींचा समावेश करतात. त्यांनी सांगितले, "जोपर्यंत जेवणाच्या एक तास आधी तुम्ही खेळ खेळता किंवा कॉफी पिता तोपर्यंत तुम्हाला झोप येणार नाही."

अनेक लोक होरी यांचा दावा ऐकून थक्क झाले. होरी यांची दिनचर्या जाणून घेण्यासाठी एका जपानी टीव्ही शोने तीन दिवस त्यांच्याबरोबर घालवले. या शोदरम्यान होरी फक्त २६ मिनिटांसाठी झोपल्याचे आढळले; पण उठल्यानंतर त्यांना खूप ऊर्जा मिळाली असल्याचे जाणवले. त्यानंतर त्यांनी नाश्ता केला आणि ते काम करण्यासाठी गेले. तसेच ते जिममध्येही गेले.

जपान शॉर्ट स्लीपर ट्रेनिंग असोसिएशनमार्फत कमी वेळ झोपण्याबाबत मार्गदर्शन देण्यात येते. त्यांच्याकडून पारंपरिक झोपण्याच्या पद्धतींना आव्हान देण्यात आहे. पण, याबाबत अनेक प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होत आहेत. त्यामुळे याबाबत तज्ज्ञ काय म्हणतात ते जाणून घेऊ या...

याबाबत दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना, जनरल फिजिशियन, एमडी, एमबीबीएस डॉ. पलेती शिव कार्तिक रेड्डी यांनी सांगितले, "दररोज फक्त ३० मिनिटे झोपल्यामुळे दीर्घकाळापर्यंत आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. मेंदूचे कार्य, स्मृती एकत्रीकरण शक्तीचे कार्य व चयापचय व्यवस्थापन यांसह विविध शारीरिक प्रक्रियांसाठी झोप आवश्यक आहे. रोज फक्त ३० मिनिटे झोपल्यामुळे अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

# राशि भविष्य

**मेष**: वाहन चालविताना, विशेष करुन वळणावर काळजी घ्या, दुस-यांचा निष्काळजीपणा तुमच्यासाठी अडचणी निर्माण करु शकतो. घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल. घरगुती पातळीवर काही अडचणी निर्माण होतील, पण आपल्या जोडीदागस छोट्या छोट्या गोष्टींवरुन टोकणे टाळावे.

**वृषभ**: आपला आहार नियंत्रणात ठेवा आणि तंदुरुस्त राहण्यासाठी नियमित व्यायाम करा. तुमचा कुणी जुना मित्र आज व्यवसायात नफा मिळवण्यासाठी तुम्हाला सल्ला देऊ शकतो जर तुम्ही हा सल्ला अमलात आणला तर, तुम्हाला धन लाभ नक्कीच होईल. तुम्हाला आनंदी ठेवण्यासाठी तुमची मुले सर्वतोपरीने प्रयत्न करतील.

**मिथुन**: वैरभाव महागात पडू शकतो. त्यामुळे आपल्या सहिष्णूतेला, उदार स्वभावाला सुरुंग लागू शकतोच, पण आपल्या विचार करण्याच्या शक्तीला धक्का लागू शकतो. परिणामी आपल्या नातेसंबंधात कायमस्वरुपी फूट पडू शकते. आज तुम्ही विना कुणाच्या मदतीने तुम्ही धन कमावण्यात यशस्वी व्हाल.

**कर्क**: सामाजिक आयुष्यापेक्षा आरोग्याला प्राथमिकता द्यावी लागेल. दुस-यांवर प्रभाव पडावा म्हणून मर्यादेच्या बाहेर खर्च करू नका. घरात नव्याने आलेल्या सदस्यामुळे साजरीकरण आणि पार्टीचे आनंददायी वातावरण तयार होईल. तुमच्या खिडकीत फुले ठेवून तुमच्या प्रिय व्यक्तीला दाखवा.

**सिंह**: आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. जर तुमची धन संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आटलेली असेल तर आज त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि तुम्हाला धन लाभ ही होऊ शकतो. आपण ज्यांच्या बरोबर राहता त्यांच्यासाठी तुम्ही खुप काही करत असाल तरी ते तुमच्यावर नाराज असतील.

**कन्या**: आज तुम्हाला तुमचे आरोग्य राखण्यासाठी आणि चांगेल दिसावे यासाठी प्रयत्न करायला खूप भरपूर मोकळा वेळ मिळेल. आर्थिक जीवनाची स्थिती आज चांगली सांगितली जाऊ शकत नाही आज तुम्हाला बचत करण्यात समस्यांचा सामना करावा लागू शकतो. प्रेमातून साहचर्य आणि बॉण्डिंग तयार होईल.

**तूळ**: इतरांवर टीका करण्यात तुमचा वेळ वाया घालवू नका, त्याने तुमच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. आपले धन संचय करण्यासाठी आज आपल्या घरातील लोकांसोबत तुम्हाला बोलण्याची आवश्यकता आहे. त्यांचा सल्ला तुमची आर्थिक स्थिती सुधारण्यात मदत करेल.

**वृश्चिक**: तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल. कौटुंबिक स्नेह मेळाव्याच्या केंद्रस्थानी व्यग्र राहाल. प्रेमीला आज तुमच्या कुठल्या गोष्टीचे वाईट वाटू शकते. ते तुमच्याशी नाराज होतील त्याच्या आधीच आपली चूक मान्य करा आणि त्यांची मनधरणी करा.

**धनु**: तुमचे आवडते छंद जोपासण्यासाठी किंवा तुमच्या आवडीच्या गोष्टींचा आनंद लुटण्यासाठी तुम्ही वेळ खर्च करायला हवा. या राशीतील मोठ्या व्यावसायिकांना आजच्या दिवशी खूप विचार करून पैसा गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. कर्मकांडे घरच्या घरीच करणे हिताचे ठरेल.

**मकर**: तुमच्या मनातील नकारात्मक विचार झटकून टाका नाहीतर तो मानसिक आजार बनेल. दानशूर कार्यात स्वत:ला झोकून द्या व त्यायोगे नकारात्मक विचारावर मात करा. त्यामुळे तुम्हाला मानसिक समाधान मिळेल. व्यापारात मजबुती येण्यासाठी तुम्ही आज काही महत्वाचे पाऊल उचलू शकतात यासाठी तुमचा कुणी जवळचा तुमची आर्थिक मदत करू शकतो.

**कुंभ**: तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे. तुमच्या घरातील वातावरणात तुम्ही उपयुक्त बदल कराल. तुम्ही साथसंगत गमावलीत तर तुमच्या हास्याला अर्थ नाही - तुमच्या हसण्याचा आवाज कुणी ऐकू शकणार नाही - तुमचे हृदय ठकठक करणार नाही.

**मीन**: आपल्या जीवनसाथी बरोबर चित्रपट पाहणे अथवा रात्रीचे जेवण करणे तुम्हाला शांतता, आराम मिळवून देईल आणि तुमचा मूड एकदम बहारदार राहील. कुणाचा सल्ला न घेता आज तुम्ही पैसा कुठे ही इन्व्हेस्ट करू नका. घरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती कामं पूर्ण करण्यासाठी लाभदायक दिवस.

# 'लालबागचा राजा' गणेश उत्सव मंडळाच्या एका मानाच्या पदी अनंत अंबानी यांची नियुक्ती



**मुंबई** - नवसाला पावणारा गणपती बाप्पा अशी 'लालबागचा राजा'ची ख्याती आहे. लालबागच्या राजाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी भाविक गर्दी करत असतात. तसंच अनेक सेलिब्रिटी, राजकारणी बाप्पाच्या चरणी लीन होण्यासाठी येतात. देश-विदेशातले व्ही-व्हीआयपीही उपस्थित राहून लालबागच्या राजाचं दर्शन घेतात. 'लालबागचा राजा' गणेश उत्सव मंडळाच्या एका मानाच्या पदी अनंत अंबानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

लालबागचा राजा हा नवसाला पावणारा गणपती म्हणून प्रसिद्ध आहे. या गणेश उत्सव मंडळाच्या कार्यकारिणी मंडळात अनंत अंबानी यांची विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. महिन्याभरापूर्वी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी एकमताने हा निर्णय घेतला अशी माहिती मिळते आहे. अंबानी कुटुंबाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातली योगदानाची दखल घेऊन लालबाग राजा मंडळाने हा निर्णय घेतला ही माहितीही समोर आली आहे. गेल्या काही वर्षांत लालबागच्या राजाच्या प्रसिद्धीत उल्लेखनिय भर पडली आहे. आणि परिणामी मंडळाची प्रतिष्ठा देखील वाढली आहे. अशा प्रतिष्ठित मंडळाच्या कार्यकारी मंडळात मानद सदस्य म्हणून निवड होणं, हे अत्यंत प्रतिष्ठेचं मानलं जातं. अनंत अंबानी यांच्या नियुक्तीमुळे मंडळाची प्रतिमा आणि प्रतिष्ठा आणखी वाढण्यास मदत होईल, असं बोललं जात आहे.

जगभरातील श्रीमंतांच्या यादीत समावेश होणारे मुकेश अंबानी यांच्या कुटुंबानं लालबागचा राजा गणेश मंडळाला रुग्ण सहाय्य निधी योजनेसाठी योगदान दिलं. त्याचप्रमाणे रिलायन्स फाउंडेशननं २४ डायलिसिस मशीन देखील 'लालबागचा राजा' (मंडळाला दिल्या आहेत. त्यामुळे वेळोवेळी मंडळाच्या कार्यात अंबानी कुटुंबीयांनी मोठा हातभार लावला आहे. अंबानी कुटुंबाच्या याच कामाची दखल म्हणून लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानं अनंत अंबानी यांची प्रमुख मानद सदस्य म्हणून कार्यकारी समितीत नेमणूक केली आहे.

# शहरबात – महापालिकेच्या आरोग्य विभागाचे दुखणे



**पुणे** - शहरात साथरोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढलेला असताना महापालिकेच्या आरोग्य विभागात आता बेशिस्तीची साथ पसरली आहे. आरोग्य विभागाच्या प्रमुखपदी अधिकारी टिकत नसल्याचे वर्षानुवर्षे जुनेच दुखणे आहे. त्यातच आता विभागातील इतरही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कृतीमुळे विभाग चर्चेत आला आहे. या विभागात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची चक्क महापालिका आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली दाखविण्यापर्यंत मजल गेली आहे. आरोग्य विभागात बेशिस्तीची ही साथ पसरली असून, आयुक्त यावर उपाय करणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत मागील काही काळात सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचा अधिकारी महापालिकेत आरोग्यप्रमुखपदी असतो. अनेक वेळा हा अधिकारी येऊन कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच त्यांची गच्छंती होते अथवा येथील गटबाजी आणि राजकारणाला कंटाळून तो निघून जातो. त्यामुळे या पदावर प्रभारी म्हणून बसलेल्या अधिकाऱ्यांची यादीच मोठी दिसते. विभागाला स्थिर प्रमुख नसल्याने सर्वच अधिकाऱ्यांनी गेल्या काही वर्षांत आपापले स्वतंत्र संस्थान सुरू केले. माझा विभाग मी हव्या त्या पद्धतीने सांभाळणार, त्यात मला कोणाचाही हस्तक्षेप नको, अशी भूमिका अनेक अधिकारी घेऊ लागले. त्यातून तुझे तू आणि माझे मी असे नवे समीकरण उदयास आले. हा प्रकार बिनबोभाट काही वर्षे सुरू होता. मागील काही दिवसांपूर्वी हा परस्पर संगनमताचा करार भंगला आणि एकमेकांवर चिखलफेक सुरू झाली. आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी एकमेकांच्या दिशेने बोट दाखविण्यास सुरुवात केली. त्यात एकमेकांवर कुरघोड्या सुरू झाल्या. काही अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात आले. भ्रष्टाचाराचे आरोपही करण्यात आले. या प्रकरणी काही सामाजिक संस्थांनी वारंवार तक्रारी करून आंदोलन केले. यामुळे अखेर महापालिकेचा आरोग्य विभाग जागा झाला. या प्रकरणी चौकशीसाठी समिती नेमण्यात आली. मात्र चौकशी करावयाची त्या अधिकाऱ्याचे समकक्ष आणि कनिष्ठ अधिकारी समितीत नेमण्याचा उफराटा कारभार करण्यात आला. त्यातून या चौकशीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले.


आरोग्य विभागातील अनागोंदीची अखेर आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दखल घेतली. त्यांनी आरोग्य विभागात फेरबदल केले. यात अधिकाऱ्यांची खाती बदलण्यात आली. या बदलीच्या आदेशानंतर काही अधिकारी तातडीने वैद्यकीय रजेवर निघून गेले. यामुळे त्यांचा पदभार इतर अधिकाऱ्यांकडे कसा सोपवायचा, असा यक्षप्रश्न निर्माण झाला. यावर एकतर्फी पदभार स्वीकारण्याचा तोडगा काढण्यात आला.

# Pune likely to get excess rainfall in last leg of monsoon



**Pune** - As the monsoon enters its last leg, Pune is set to get excess rainfall as the seasonal quota is already breached. Pune as on September 4 received 929.3 mm of rainfall compared to 638.2 mm of rainfall it receives during the June-September monsoon season. Thus any more rainfall would be in excess for the city. S D Sanap, scientist with India Meteorological Department, said whatever rainfall Pune would now receive would be in excess. "The city has already received its quota and thus Pune would end the season with excess rainfall," he said. This would be a positive aspect, as last year the city and the district have reported large deficit due to failure of the monsoon.Sanap said that Pune and its surrounding areas are expected to receive light to medium rainfall in the next four to five days. The 10-day Ganesh festival would also see very light rainfall, he said.

# गणेशोत्सवात 'पीओपी' मूर्ती नकोच, थेट उत्पादकांवर कारवाई



**नागपूर** : पर्यावरणासाठी हानिकारक असणाऱ्या प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) आणि तत्सम वस्तूंपासून देवी-देवतांच्या मूर्तीवर बंदी आणण्याचा न्यायालयाचा मानस आहे. यासाठी मागील सुनावणीत महापालिकेला सार्वजनिक मंडळांना परवानगी देताना पीओपीबाबत स्पष्ट अट ठेवण्याचे आदेश दिले होते, असे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्पष्ट केले. यावर महापालिकेच्यावतीने नियमांमध्ये सुधारणा करण्याची ग्वाही न्यायालयाला दिली. पीओपी मूर्ती संदर्भात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उत्पादकांवर आणि विक्रेत्यांवर काय कारवाई करण्यात आली, याविषयी महापालिकेला दोन दिवसात माहिती सादर करायची आहे.

'पीओपी' मूर्तींबाबत उच्च न्यायालयाने स्वत: जनहित याचिका दाखल करून घेतली आहे. याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. उच्च न्यायालयाने २८ ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीत महापालिकेला सूचना केल्या होत्या की, गणेश मंडळांना परवानगी देताना पीओपीच्या मूर्तींबाबत स्पष्ट अट घाला. या अटींची पूर्तता न करणाऱ्या मंडळाची परवानगी रद्द करून त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई तसेच शिक्षेची तरतूद करा. २०२० साली केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पीओपी मूर्तींबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली होती.

राज्य शासन आणि महापालिकेच्यावतीने याची अंमलबजावणी केली जात असल्याचे सांगितले गेले. मात्र, परवानगीच्या अटींमध्ये मात्र पीओपीचा उल्लेख नसल्याचे सांगण्यात आले. यानंतर न्यायालयाने पीओपीबाबत स्पष्ट शब्दात अट घालण्याचे आदेश महापालिकेला दिले होते. महापालिकेच्यावतीने परवानगी अर्जात ही अट टाकण्याची ग्वाही शपथपत्राच्या माध्यमातून न्यायालयाला दिली. न्यायालयाने महापालिकेच्या शपथपत्र 'रेकॉर्ड'वर घेत उल्लंघन करणाऱ्यावर होणाऱ्या कारवाईबाबत गुरुवार ५ सप्टेंबरपर्यंत माहिती सादर करण्याचे आदेश दिले. याचिकेवर पुढील सुनावणी ६ सप्टेंबर रोजी होणार आहे.

पीओपी मूर्ती साच्यापासून तयार करतात. त्यामुळे ती झटपट होते. पीओपीची मूर्ती कितीही उंच बनवता येते. मातीच्या मूर्तीपेक्षा ती टीकायलाही मजबूत असते. शिवाय वजनाने हलकी असल्याने हाताळणेही सोपे जाते. त्याउलट, शाडूच्या मूर्ती जड असतात. मातीची असल्याने ती काळजीपूर्वक हाताळावी लागते. या मूर्ती फार उंच बनवता येत नाहीत. शिवाय, माती महाग मिळते परिणामी मूर्तीची किंमतही वाढते.

# BCCI AGM In Bengaluru On September 29; Secretary Election Not On Agenda

**Hyderabad** - The 93rd Annual General Meeting (AGM) of the Board of Control for Cricket in India will be held in Bengaluru on September 29. A notice and the agenda for the much anticipated AGM was sent to all State Associations on Thursday morning by BCCI Secretary Jay Shah.

Sources said that the BCCI may hold a Special General Meeting for the purpose of choosing the new Secretary. As reported by ETV Bharat, a few names who are in the fray to succeed Jay Shah are IPL Chairman Arun Singh Dhumal, BCCI Vice President Rajiv Shukla, BCCI Treasurer Ashish Shelar and DDCA chief Rohan Jaitley.

The other important point in the meeting's 18-point agenda is the appointment of BCCI's representative to the ICC meetings, as Shah will no longer be available for that role. The name of current BCCI president Roger Binny might be discussed for the board's representative to the ICC, or it could fall on the incoming secretary. But at 69, Binny does not have age on his side with 70 being the upper ceiling to be in administration.

# पंचवटी, राज्यराणी एक्स्प्रेसला विलंब, रेल्वेला नोटीस




**नाशिक** – पंचवटी आणि राज्यराणी एक्स्प्रेस काही महिन्यांपासून दररोज अर्धा ते पाऊण तास विलंबाने धावत असल्याच्या पार्श्वभूमीवर, मासिक पासधारक व प्रवासी वेल्फेअर असोसिएशनने मध्य रेल्वेला कायदेशीर नोटीस बजावली आहे. यावर उपाययोजना न झाल्यास प्रवाशांना होत असलेल्या मानसिक व आर्थिक त्रासासाठी ग्राहक मंचाकडे दाद व नुकसान भरपाई मागण्याचा इशारा देण्यात आला आहे.

संघटनेच्या सल्लागार ॲड. क्रांती गायकवाड-कांबळे यांनी ही नोटीस दिली. याबाबत संघटनेचे अध्यक्ष राजेश फोकणे, उपाध्यक्ष किरण बोरसे आणि पदाधिकारी पाठपुरावा करीत आहेत. नाशिककरांची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या राज्यराणी व पंचवटी एक्स्प्रेस या दोन्ही मुंबईच्या लोकल रेल्वेप्रमाणे आंतरशहर (इंटरसिटी) दर्जाच्या महत्वाच्या गाड्या आहेत. काही महिन्यांपासून त्या दररोज अर्धा ते पाऊण तास उशिरा धावत असल्याने नाशिकहून मुंबईला दररोज नोकरी, व्यवसायानिमित्त जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयात पोहोचण्यास विलंब होत आहे.

यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. मुंबई, भुसावळच्या रेल्वे प्रशासनाला निवेदन देत या रेल्वे गाड्या नियमितपणे वेळेत सोडण्याची मागणी करण्यात आली होती.

# Student at Delhi's National Law University dies by 'suicide'



**DELHI** - A law student at the National Law University in Delhi allegedly died by suicide on Monday, the police said.

The body of the third year LLB student was found in her hostel room on Tuesday afternoon, they said, adding that they have got a suicide note from near the body. Additional DCP (Dwarka) Nishant Gupta said the young woman, a native of Chennai, was allegedly tensed over her academics and had mentioned about her suicidal thoughts to her roommates in April. "Her roommates had informed her family about the issue and they had taken her to Chennai for a week," said DCP Gupta. "She left a suicide note stating that she doesn't blame anyone for her decision. She also apologised to her parents for taking the extreme step," said a police officer. The body has been kept in the mortuary and the post-mortem will be conducted on Thursday, the official said. The parents of the deceased are likely to arrive on Thursday.

# डोंबिवलीतील रिजेन्सी इस्टेट, गृहसंकुलातील क्लब हाऊसला आग



**डोंबिवली** – डोंबिवलीतील शिळफाटा रस्त्यावरील गोळवली येथील रिजेन्सी इस्टेट गृहसंकुलामधील क्लब हाऊसला बुधवारी रात्री १२ वाजताच्या दरम्यान अचानक आग लागली. बाहेर मुसळधार पाऊस सुरू असताना आग लागल्याने रहिवाशांची आग विझविण्यासाठी पळापळ झाली. जागरूक रहिवाशांनी क्लब हाऊसमधील अग्निरोधक यंत्रणेचा वापर करून आगीवर प्राथमिक स्तरावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. क्लब हाऊसमधील बहुतांशी काम फर्निचरचे असल्याने आगीने पेट घेतला. आजुबाजुच्या इमारतींमधील रहिवासी आग विझविण्यासाठी क्लब हाऊसच्या दिशेने धावून आले. अग्निशमन दलाला ही माहिती तात्काळ रहिवाशांनी दिली. रहिवासी आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करत असतानाच, अग्निशमन जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाण्याचे फवारे मारून आग बाहेर पसरणार नाही अशा पध्दतीने अर्धा तासात आगीवर नियंत्रण मिळविले. आगीमुळे क्लब हाऊसच्या आतील भागाचे नुकसान झाले.

## मेट्रो ३ प्रकल्पात स्थानकांच्या बांधकामासाठी झाडे तोडल्याचे प्रकरण

# ३०९३ झाडांपैकी केवळ ७२४ झाडांचेच पुनर्रोपण



**मुंबई** - कुलाबा ते सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या स्थानकांच्या बांधकामासाठी तोडलेल्या झाडांचे आच्छादन पुनर्संचयित करण्याचे वारंवार आदेश देऊनही मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) २८ पैकी १८ स्थानक परिसरात आतापर्यंत ३०९३ झाडांपैकी केवळ ७२४ झाडांचेच पुनर्रोपण केल्याबाबत उच्च न्यायालयाच्या विशेष समितीने बुधवारी नाराजी व्यक्त केली.

झाडे लावण्याबाबतच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी महाराष्ट्र विधी सेवा सहकार्य विभागाला या स्थानकांना भेट देण्याचे आदेश दिले. आतापर्यंत ३६ हजार झाडे लावल्याचा आणि त्यांची काळजी घेतली जात असल्याचा दावा एमएमआरसीएलने न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या द्विसदस्यीय विशेष समितीसमोर केला. या सगळया झाडांचे जिओ टॅगिंग करण्याचे आदेश समितीने एमएमआरसीएलला दिले आहेत. मात्र, अद्याप ते करण्यात आलेले नाही याबाबत द्विसदस्यीय विशेष समितीने पुन्हा एकदा संताप व्यक्त केला. तसेच, कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांसह प्रकल्प आणि तंत्रज्ञान संचालकांना उपस्थित राहण्याचे आदेश देऊ व स्थानक परिसरातील झाडांचे पुनर्संचयन का केले जात नाही, पुनर्संचयित झाडांचे जिओटॅगिंग अद्याप का केले गेले नाही हे स्पष्ट करण्यास सांगू, असा इशारा दिला. परंतु, एमएमआरसीएलच्या वकिलांनी केलेल्या विनंतीनंतर समितीने यासंदर्भातील आदेशाचे पालन करण्यासाठी एमएमआरसीएलला आणखी एक संधी दिली.

# म्हाडा मुंबई मंडळाच्या 2030 घरांसाठी सोडत, लवकरच सोडतीच्या तारखेची घोषणा

● मुंबई, (प्रतिनिधी) :

म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या २०३० घरांच्या सोडतीसाठी १३ सप्टेंबरला सोडत काढली जाणार होती. मात्र काही कारणाने अर्जविक्री-स्वीकृतीसह सोडतपूर्व प्रक्रियेला १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आल्याने सोडत लांबणीवर पडली आहे. त्यामुळे आता नक्की सोडत केव्हा जाहीर होणार याकडे अर्जदारांचे, इच्छुकांचे लक्ष लागले आहे. त्यानुसार मुंबई मंडळाकडून सोडतीची तारीख निश्चित करण्यात आली आहे.

ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात सोडत काढली जाण्याची शक्यता आहे. त्यातही ७ किंवा ८ ऑक्टोबरला सोडत जाहीर होण्याची शक्यता आहे. मुंबई मंडळाकडून अत्यल्प, अल्प, मध्यम आणि उच्च गटातील २०३० घरांसाठी ऑगस्टमध्ये सोडत काढण्यात आली. तर या सोडतीअंतर्गत अर्जविक्री-स्वीकृतीस ९ ऑगस्टपासून सुरुवात करण्यात आली. ही प्रक्रिया सुरू होऊन पंधरा दिवस उलटले तरी म्हणावा तसा प्रतिसाद नसल्याने मुंबई मंडळाने सोडतीस १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. महत्त्वाचे म्हणजे यंदाच्या सोडतीतील सर्वच योजनेतील घरे प्रचंड महाग असल्याने सोडतीला प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र होते. त्यामुळे अर्जविक्री-स्वीकृतीची ४ सप्टेंबर अशी अंतिम मुदत पुढे ढकलत या प्रक्रियेस मुदतवाढ देण्याचा निर्णय मंडळाने घेतला. त्यानुसार मागील आठवड्यात गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी अर्जविक्री-स्वीकृतीची अंतिम तारीख १९ सप्टेंबर अशी करण्यात आल्याचे जाहीर केले. तर दुसरीकडे सोडतीतील पुनर्विकासाअंतर्गत प्राप्त झालेल्या ३७० घरांच्या किमतीतही १० ते २५ टक्क्यांनी कपात केली. या सर्व पार्श्वभूमीवर साहजिकच १३ सप्टेंबर रोजी होणारी सोडत पुढे गेली. दरम्यान सोडतीची नवीन तारीख लवकरच जाहीर करू असे मुंबई मंडळाकडून सांगण्यात आले होते. मात्र अद्यापही नवीन तारीख तसेच पात्र अर्जदारांची प्रारूप यादी, अंतिम यादी केव्हा प्रसिद्ध होणार हेही अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. त्यामुळे सोडतीच्या तारखेकडे आणि सोडत पूर्व प्रक्रियेच्या वेळापत्रकाकडे अर्जदार, इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

अर्जदार आणि इच्छुकांची ही प्रतीक्षा आता संपली आहे. कारण मुंबई मंडळाने सोडतपूर्व प्रक्रियेचे वेळापत्रक आणि सोडतीची तारीख निश्चित केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात सोडतीचा निकाल जाहीर केला जाणार आहे. ७ आणि ८ ऑक्टोबर अशा दोन तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. यापैकी जी कोणती तारीख गृहनिर्माण मंत्र्यांकडून अंतिम होईल त्या तारखेला सोडत काढण्याचा निर्णय घेतला जाईल. त्यानुसार एक-दोन दिवसांत तारीखेची घोषणा मंडळाकडून केली जाणार असल्याचेही सूत्रांनी सांगितले आहे. त्याच वेळी वांद्र्यातील रंगशारदा सभागृह किंवा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सोडत होणार हेही एक-दोन दिवसांत अंतिम केले जाणार आहे.

## छत्तीसगडनंतर तेलंगणातही सुरक्षा दलाच्या कारवाईत ६ नक्षलवादी ठार

● हैदराबाद, (प्रतिनिधी) :

तेलंगणातील भद्राद्री कोठागुडेम जिल्ह्यात गुरुवारी पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक झाली. पोलिसांनी चकमकीत सहा नक्षलवाद्यांना ठार केले.

छत्तीसगडच्या सीमेजवळील काराकागुडेम मंडलच्या रघुनाथपलेमजवळ पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत तेलंगणातील काही प्रमुख नक्षलवादी नेते ठार झाल्याचं सांगण्यात येत आहे. पोलीस पथकांकडून शोध मोहिम सुरू असताना जंगल परिसरात अचानक चकमक झाली. चकमकीदरम्यान गोळ्या लागल्यानं दोन पोलिसही जखमी झाले आहेत.

पोलिसांनी सांगितलं की, गेल्या १०-१५ वर्षांतील सातत्यानं नक्षलवादी विरोधातील मोहिमेतील तेलंगणात नक्षलवाद्यांचा पूर्णपणे नायनाट झाला आहे. परंतु नक्षलवादी अजूनही छत्तीसगड आणि महाराष्ट्रासारख्या शेजारील राज्यांच्या सीमेवर असलेल्या भागात कार्यरत आहेत आहेत. बंदी घातलेल्या सीपीआयचे (माओवादी) नेतृत्व तेलंगणातील लोकांच्या हाती असणं ही चिंतेची बाब असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. गुरुवारी चकमकीमुळे तेलंगणात पुन्हा नक्षलवादी कारवाया सुरू करण्याच्या प्रयत्नात असलेल्या माओवाद्यांना मोठा धक्का बसला आहे. मचरला येसोबू ठार-नुकतेच छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांनी सहा महिलांसह नऊ नक्षलवाद्यांचा खात्मा केल्यानंतर तेलंगणात दोन दिवसांनी नक्षलवादी ठार केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत तेलंगणाचा प्रमुख नक्षलवादी नेता माचेर्ला



असोबू याचाही मृत्यू झाला. नक्षलवादी नेता मचरला येसोबू याचा छत्तीसगडमधील दंतेवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत मृत्यू झाला. त्याला येल्लान्ना, जगन आणि रणदेव दादा या नावांनीही ओळखले जात होते. एसोबू, वय ७१ हा नक्षलवादी संघटनेच्या केंद्रीय समिती सदस्य आणि महाराष्ट्रासह छत्तीसगडचा प्रभारी होता. तो हनुमाकोंडा जिल्ह्यातील काझीपेट मंडलातील टेकुलागुडेमचा रहिवासी होता. नक्षलवादी चळवळीतील नेतृत्व संपुष्टात- येसोबूनं केवळ पाचवीपर्यंतच औपचारिक शिक्षण घेतले होते. सरंजामशाहीविरोधातील कथित लढ्यात सामील होण्यापूर्वी त्यानं सुरुवातीला मजूर म्हणून काम केलं. शेवटी कट्टरपंथी युवा संघटनेचं नेतृत्व केले. १९९१ मध्ये, तो पीपल्स वॉर अण्णासागर दलात सामील झाला, नक्षलवादी गटातील एक प्रमुख नेत्याचं स्थान मिळविलं. येसोबूच्या मृत्युमळे त्याचे ३३ वर्षांचे नक्षलवादी चळवळीतील नेतृत्व संपुष्टात आले. येसोबूच्या पत्नी लक्ष्मीचे गेल्या वर्षी निधन झाले. त्याच्या पश्चात तीन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. त्याचा मुलगा महेश चंद्र यानं पित्याच्या मृत्यूबाबत दु:ख व्यक्त केलं. पोलिसांनी येसोबूसाठी 5 लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. दंतेवाडा आणि विजापूरमधील चकमकीत ९ ठार- दंतेवाडा आणि विजापूर जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील लोहगाव पुरंगेल उंड्री येथील जंगलात सोमवारी पोलीस-नक्षलवादी चकमकीत झाली. या चकमकीत ९ सशस्त्र गणवेशधारी नक्षलवादी ठार झाले. चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांमध्ये दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी रणधीर (२५ लाख) आणि पाच लाखांचे बक्षीस असलेले ५ एसीएम, आंध्र-ओडिशा बॉर्डर स्पेशल झोनल कमिटीचे सदस्य, पश्चिम बस्तर आणि दरभा विभागासह दरभा विभागाचे सदस्य यांचा समावेश आहे. छत्तीसगडमधील दंतेवाडा-विजापूर सीमेवरील लोहगाव, पुरंगेल आणि उंड्री जंगल परिसरात चकमकीत पीएलजीए सदस्या शांती, क्षेत्र समिती सदस्या सुशीला मडकम, कट्टेकल्याण क्षेत्र समिती सदस्य गंगी मुचाकी, सुरक्षा दल सदस्या ललिता, आंध्र-ओडिशा बॉर्डर स्पेशल झोनल कमिटी गार्ड कविता आणि मलंगीर क्षेत्र समिती सदस्य कोसा मडवी यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त- सुरक्षा दलांनी एसएलआर १ नग, ३०३ रायफल २ नग, टाटा कार्बाइन १ नग, ८एमएम रायफल १ नग, ३१५ बोअरची रायफल १ नग, १२ बोअरची रायफल २ नग यांचा समावेश आहे. बीजीएल लाँचसह मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त केला. दंतेवाडा जिल्ह्यातील एलिट फोर्स डीआरजी, २३० कॉर्प्स यंग प्लाटून यांच्या संयुक्त कारवाईत २ लोडेड बंदूक आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

## पुण्याच्या बँकरने अटल सेतूवरून उडी मारली, कामाच्या दबावाला कंटाळून टोकाचा निर्णय

● नवी मुंबई, (प्रतिनिधी) :



नवी मुंबईच्या अटल सेतूवरून उडी मारून बँकरने आत्महत्या केलीची धक्कादायक घटना समोर आली आहे. ३५ वर्षीय बँकरने समुद्रात उडी मारल्याचे कळताच बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पण तोपर्यंत उशिर झाला होता. पाण्यामध्ये बुडून बँकरचा मृत्यू झाला त्याचा मृतदेह बाहेर काढून कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील ३५ वर्षीय बँकरने नवी मुंबईतल्या अटल सेतूवरून उडी मारून आत्महत्या केली. ॲलेक्स रेगी असे या बँकरचे नाव असून तो पिंपरी येथील रहिवासी होता. ॲलेक्स एका बैठकीसाठी मुंबईत आला होता. यावेळी तो चेंबूर येथे राहणाऱ्या सासऱ्याला भेटण्यासाठी गेला होता. त्यानंतर तो पुण्याला परत निघाला होता. पण वाटेमध्ये अटल सेतू पुलावर कार थांबवून त्याने समुद्रात उडी मारली. ॲलेक्सवर कामाचा प्रचंड दबाव असल्याची माहिती त्याच्या कुटुंबियांनी दिली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी ॲलेक्सने कुठलीही सुसाईड नोट लिहिली नव्हती. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवरून मॉनिटरिंग टीमने कार थांबलेली पाहिली आणि पोलिसांना इशारा दिला. पण पोलिस पोहोचण्याआधीच ॲलेक्सने उडी मारली.

## बांधकाम सुरू असलेल्या इमारतीचा स्लॅब कोसळल्यानं तीन मजुरांचा मृत्यू

● मुंबई, (प्रतिनिधी) :

मालाड येथे इमारतीचा स्लॅब कोसळल्यानं तीन मजुरांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मालाड पूर्व गोविंद नगर परिसरातील 'नवजीवन बिल्डिंग' या इमारतीचं काम सुरू असून, सदर इमारत २३ माळ्यांची आहे. या इमारतीचा स्लॅब कोसळल्यानं एकूण ६ मजूर ढिगाऱ्याखाली अडकले होते. यातील ३ मजुरांचा मृत्यू झाला असून २ मजुरांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आलं. तर अन्य एका मजुरावर अस्थी तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असल्याची माहिती पालिकेनं दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दोन वाजता पालिकेच्या १९१६ या हेल्पलाईन नंबरवर मालाड पूर्व गोविंद नगर परिसरातील 'नवजीवन बिल्डिंग' या इमारतीचा स्लॅब कोसळल्याची माहिती देणारा फोन आला. स्थानिकांनी ढिगाऱ्याखाली काही मजूर अडकल्याची माहिती अग्निशमन दलाच्या जवानांना दिली. सदर घटनेची माहिती मिळताच पालिकेच्या अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि तत्काळ मदत कार्याला सुरुवात केली. पालिकेने दिलेल्या माहितीनुसार, दुर्घटना झालेली सदर इमारत तळमजला अधिक २३ माळे अशा स्वरूपाची असून, यातील विसाव्या मजल्यावर स्लॅब कोसळला. सदर इमारत झोपडपट्टी पुनर्वसन विभाग अंतर्गत विक्री केली जाणाऱ्या इमारतींमध्ये असून, घटनास्थळी झोपडपट्टी पुनर्वसन विभागाचे अधिकारी देखील असल्याची माहिती पालिकेनं दिली आहे.

## घाटकोपरमधील रमाबाई आंबेडकर नगर पुनर्विकास



● मुंबई, (प्रतिनिधी) :

घाटकोपरमधील माता रमाबाई नगर पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत १४ हजारांहून अधिक रहिवाशांचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून पुनर्वसन केले जाणार आहे. येत्या काही महिन्यात पुनर्विकासाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. टप्प्याटप्प्याने हे काम हाती घेण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात २२ मजली आठ पुनर्वसित इमारती बांधण्यात येणार आहेत. या इमारतीत सुमारे चार हजार घरांचा समावेश आहे. पूर्वमुक्त मार्ग प्रकल्पबाधित पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत संयुक्त भागिदारी तत्त्वावर रमाबाई आंबेडकर नगर, नालंदा नगर आणि कामराज नगर येथील १४ हजारांहून अधिक झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. यासाठी पात्रता निश्चितीचे काम सुरू असून आतापर्यंत १० हजारांहून अधिक झोपडपट्टीवासियांची पात्रता निश्चिती पूर्ण झाली आहे. यापैकी सहा हजार ५०० पात्र झोपडीधारकांबरोबर एमएमआरडीएने करारही केला आहे. पात्र झोपडीधारकांना मंगळवारपासून घरभाड्याच्या धनादेशाचे वाटपही सुरू करण्यात आले आहे.

## पतंगराव कदम यांच्या पुतळ्याचं राहुल गांधींच्या हस्ते अनावरण





● मुंबई, (प्रतिनिधी) :

लोकसभेतील विरोधी पक्षनेते पदी निवड झाल्यानंतर राहुल गांधी हे प्रथमच महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यांच्यासोबतच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि राज्यसभेचे विरोधी पक्षनेते हेदेखील महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. राहुल गांधी यांच्याहस्ते सांगलीतील कडेगाव येथे दिवंगत पतंगराव कदमांच्या लोकतीर्थ स्मारक पुतळ्याचं उद्घाटन झालं. सांगलीविरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याहस्ते कडेगाव येथे दिवंगत पतंगराव कदमांच्या लोकतीर्थ स्मारक पुतळ्याचं उद्घाटन झालं. यावेळी राष्ट्रवादी - एसपी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेते रमेश चेंनीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील, खासदार छत्रपती शाहू महाराज, विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण, विश्वजीत कदम उपस्थित होते. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याहस्ते कडेगाव येथे दिवंगत पतंगराव कदमांच्या लोकतीर्थ स्मारक पुतळ्याचं उद्घाटन झालं. यावेळी राहुल गांधी यांनी स्मारकस्थळी कदम कुटुंबाची भेट घेतली. याप्रसंगी विश्वजीत यांच्या आई विजयामाला कदम यांची गळा भेट घेतली, यावेळी विश्वजीत कदम भावनिक झाले होते.

# लाडकी बहीण योजना, श्रीराम मंदिर, अमली पदार्थांचे दुष्परिणाम

## गणेशोत्सवातील देखाव्यांत वैविध्यपूर्ण विषयांची हाताळणी

● पुणे, (प्रतिनिधी) :

अयोध्येत साकारलेल्या श्रीराम मंदिराची प्रतिकृती, अमली पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम, राज्य सरकारची लाडकी बहीण योजना, राजकारणावर भाष्य करणारा कोणता झेंडा घेऊ हाती, प्लॅस्टिकचा वापर टाळण्यासंदर्भात जनजागृती अशा वैविध्यपूर्ण विषयांची हाताळणी करणारे देखावे यंदाच्या गणेशोत्सवात पुणेकरांचे लक्ष वेधणार आहेत. ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक आणि राजकीय विषयांवरील देखावे उत्सव मंडपात साकारण्याची कार्यकर्त्यांची लगबग सुरू झाली आहे. प्रभू श्रीराम यांच्या जीवनातील प्रसंगांवर आधारित ते छत्रपती शिवाजी महाराज यांची शौर्यगाथा सांगणाऱ्या देखाव्यांना मागणी आहे. तर, गणेशोत्सवासाठी स्थिर देखाव्यांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. प्रतिष्ठापना आणि विसर्जन मिरवणुकीत वैविध्यपूर्ण विषयांवरील स्थिर देखावे पाहायला मिळणार आहेत.

विविध गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी साकारलेल्या वैविध्यपूर्ण विषयांवरील हलते देखावे पाहण्यासाठी उत्सवात मोठी गर्दी होते. हलते देखावे साकारणाऱ्या कलाकारांनी मंडळांच्या मागणीप्रमाणे आणि संकल्पनेप्रमाणे हलत्या देखाव्यांचा सेट तयार केला आहे. यंदा हलत्या देखाव्यांमध्ये सामाजिक विषयांवरील देखाव्यांना सर्वाधिक प्रतिसाद असून, उत्सवात सामाजिक जनजागृती व्हावी, यासाठी मोबाइलच्या दुष्परिणामांपासून ते वृक्ष संवर्धनावर आधारित हलत्या देखाव्यांचे सेट तयार करण्यात आले आहेत. भारतीय जवान, जातिभेद निर्मूलन, गडकिल्ले संवर्धन अशा सामाजिक विषयांवरही हलते देखावे पुणेकरांचे लक्ष वेधून घेणार आहेत. स्थिर देखाव्यांचीही तयारी कलाकारांनी सुरू केली असून त्यातही ऐतिहासिक आणि सामाजिक विषयांचा समावेश आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून हलते देखावे तयार करणारे सतीश तारू म्हणाले, हलत्या देखाव्यांना यंदा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ऐतिहासिक, धार्मिक आणि सामाजिक प्रबोधनपर हलते देखावे यंदा तयार केले आहेत. एका देखाव्याच्या सेटमध्ये चार ते दहा फायबरच्या पुतळ्यांचा समावेश केला आहे. प्रत्येक पुतळ्याला देखाव्यांच्या विषयांप्रमाणे साजेशी वेशभूषा, आभूषणेही तयार केली आहेत. देखाव्यांमधील सगळे पुतळे फायबरचे असून, आम्ही गेल्या काही महिन्यांपासून देखावे तयार करण्यासाठी काम करीत आहोत.

